
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

दिशा



वर्ष बाविसावे / अंक ५ / मे २०२१

# संपादकीय

## रॉजरच्या यशाला अमलची शिडी

नोबेल पारितोषिक हे शास्त्रज्ञांच्या मूलभूत कार्याला मिळालेली पावती असते. १९०१ पासून हे पारितोषिक देण्यात येत आहे. साधारणपणे सप्टेंबर ऑक्टोबर मध्ये या पारितोषिकाची घोषणा होते आणि डिसेंबर महिन्यात स्वीडनची राजधानी स्टॉकहोम येथे एका भव्य समारंभात हे पारितोषिक दिले जाते. ऑक्टोबर २०२० मध्ये भौतिकशास्त्राचे पारितोषिक जाहीर झाले. ते अँड्री घेज (Andrew Ghez), रेनहार्ड गेंझेल (Reinhard Genzel) आणि रॉजर पेनरोज (Roger Penrose) या तिघांना देण्यात आले. त्यातील अर्धा वाटा रॉजर पेनरोज या ब्रिटिश शास्त्रज्ञाचा होता. त्याने खगोलशास्त्रात संशोधन केले होते. ब्रह्मांडात कृष्णविवरे कशी तयार होतात हे सांगण्याचा त्याने प्रयत्न केला होता. पेनरोज यांच्या संशोधनाची दिशा एका भारतीय शास्त्रज्ञाने सुकर केली होती. त्याचे नाव प्राध्यापक अमल कुमार रायचौधरी (Amal Kumar Raychaudhuri) असे होते. या लेखात आपण अमल कुमार रायचौधरी यांचे कार्य आणि त्याचा रॉजर पेनरोज यांच्या कार्यावर पडलेला प्रभाव या बाबींची चर्चा करणार आहोत.

अमल कुमार रायचौधरी हे भौतिक शास्त्राचे गाढे अभ्यासक होते. त्यांनी आपले शिक्षण कलकत्ता येथे पूर्ण केले. त्यांचा कल संशोधनाकडे होता. पूर्ण वेळ संशोधन करता यावे यासाठी त्यांनी इंडियन असोसिएशन फॉर कल्टिवेशन ऑफ सायन्स (Indian Association for Cultivation of Science) या संस्थेत प्रवेश घेतला. परंतु तिथे त्यांना हवे ते स्वातंत्र्य मिळाले नाही. म्हणून ते अध्यापनाकडे वळले. त्यांनी प्रथम कोलकात्याच्या आशुतोष महाविद्यालयात अध्यापनाचे काम सुरू केले. काही वर्षे त्या महाविद्यालयात राहिल्यानंतर १९६१ मध्ये ते प्रसिद्ध प्रेसिडेन्सी महाविद्यालयात रुजू झाले. पुढील २७ वर्षे ते त्याच महाविद्यालयात शिकवित होते. या कालावधीत त्यांनी अनेक विद्यार्थ्यांमध्ये खगोलशास्त्राची आवड निर्माण केली. मुंबईच्या टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या ॲस्ट्रोफिझिक्स विभागात (Astrophysics Department of the Tata Institute of Fundamental Research, Mumba) आणि पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनामी ॲण्ड ॲस्ट्रोफिझिक्स (Interuniversity Centre for Astroniomy and Astrophysics) या संस्थेत त्यांचे अनेक विद्यार्थी कार्यरत आहेत. त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये ते 'एकेआर' या टोपणनावाने प्रसिद्ध होते.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

विसाव्या शतकातील प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाईन यांनी १९१५ साली जनरल थेरी ऑफ रिलेटिव्हिटी (General Theory of Relativity) प्रकाशित केली. त्यांचे प्रायोगिक तसेच सैद्धांतिक भौतिकशास्त्रावर दूरगामी परिणाम झाले. त्या सिद्धांतात अपेक्षित केलेली अनेक निरीक्षणे प्रयोगाने पडताळून पाहणे आवश्यक होते. त्याचबरोबर सापेक्षता सिद्धांताने सैद्धांतिक भौतिकीची अनेक दालने उघडली गेली. त्याकडे अनेक शास्त्रज्ञांनी आपला मोर्चा वळविला. त्यामध्ये एक होते प्राध्यापक अमल कुमार रायचौधरी. त्यांनी असे गृहीत धरले की, हे ब्रह्मांड स्वतःभोवती फिरते आहे. त्याचबरोबर त्यातील अनेक स्तर एकमेकांवर घसरत आहेत. गुरूत्वीय बल, वर्तुळाकार गतीमुळे निर्माण झालेले बल आणि स्तराच्या गतीमुळे निर्माण झालेले बल यामध्ये जेव्हा संतुलन होते तेव्हा ब्रह्मांडाला स्थैर्य येते असे त्यांचे मत होते. या तीनही बलाचा एकत्रित विचार करून एकेआर यांनी एक समीकरण मांडले. हे समीकरण असलेला त्यांचा लेख फिझिकल रिव्ह्यू (Physical Review) या संशोधन पत्रिकेत १९५५ साली प्रकाशित झाला. त्याच वर्षी अल्बर्ट आइन्स्टाईन यांचा मृत्यू झाला. त्यांच्या समीकरणाला आधी फारसे महत्त्व दिले गेले नाही. परंतु त्यानंतर काही महिन्यांतच रशियन शास्त्रज्ञ लिंडे यांनी तसेच समीकरण सिद्ध केले. आता ते समीकरण 'रायचौधरी समीकरण' (Raychaudhuri Equation) म्हणून ओळखले जाते.

रॉजर पेनरोज हे ऑक्सफर्ड विद्यापीठात सैद्धांतिक भौतिकीत काम करीत होते. कृष्णविवरे (Black Holes) कशी निर्माण होतात हे समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता. या कामात प्रसिद्ध ब्रिटिश भौतिक शास्त्रज्ञ स्टिफन हॉकिंग (Stephen Hawking) त्यांना मदत करीत होते. संदर्भ ग्रंथ बघत असताना रायचौधरी यांच्या समीकरणाने ते दोघेही प्रभावित झाले. त्यांच्या कामाची सुरुवात त्यांनी रायचौधरी यांच्या समीकरणापासूनच केली. अर्थात ते नंतर खूप पुढे गेले. तरीही रायचौधरी यांच्या कार्याचे महत्त्व ते जाणून होते. त्यांच्या लेखनातून आणि भाषणातून ते एकेआर यांचा वारंवार उल्लेख करीत असत. त्यांना प्रत्यक्ष भेटण्याची रॉजर पेनरोज यांची इच्छा होती. ती १९८७ साली फळाला आली. त्यावर्षी कोलकात्याच्या जादवपूर विद्यापीठात भौतिकशास्त्रज्ञांची एक आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. त्या परिषदेला रॉजर पेनरोज आले होते. त्यांनी वेळ काढून प्राध्यापक रायचौधरी यांची भेट घेतली.

अमल कुमार रायचौधरी यांनी २००५ साली इहलोकीची यात्रा संपवली. त्यांच्या मृत्यूच्या दोन महिने आधी त्यांच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन एकेआर यांच्या जीवनावर एक फिल्म तयार केली. ही फिल्म यू ट्यूब वर उपलब्ध आहे. या फिल्मसाठी एकेआर यांच्या अनेक विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्याचबरोबर ज्येष्ठ खगोलशास्त्रज्ञ प्राध्यापक जयंत नारळीकर यांची देखील मुलाखत घेण्यात आली. ते असे सांगतात की, रायचौधरी समीकरण जेव्हा प्रसिद्धिला आले तेव्हा ते केंब्रिज येथील किंग्ज कॉलेजमध्ये (King's College Cambridge) संशोधनाचे कार्य करीत होते. ते आणि त्यांचे मार्गदर्शक प्राध्यापक फ्रेड हॉईल

(मलपृष्ठ क्र. ३ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

वर्ष बाविसावे/अंक ५/मे २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २५ वे/अंक ११ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शालेय शिक्षणातील बदल आणि अंमलबजावणीतील आव्हाने | डॉ. श्रीकांत सुसर | ३ |
| ३) | ज्ञानेश्वरी (अध्याय : १) | भाग्यश्री कुलकर्णी | ६ |
| ४) | कलम ३७० आणि ३५अचे वर्षश्राध्द | डॉ. प्रमोद पाठक | ८ |
| ५) | अंतराळ शास्त्रज्ञ डॉ. कल्पना चावला | श्री. नरेंद्र गोळे | १८ |
| ६) | गडचिरोली जिल्ह्यातील दोन त्रिवेणी संगम | श्री. दिलीप वंडलकर | २३ |
| ७) | परिसर वार्ता | संकलित | २७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : शालेय शिक्षणातील बदल आणि अंमलबजावणीतील आव्हाने

*नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० जाहीर झालेले आहे. शालेय शिक्षणामध्ये या निमित्ताने होणारे बदल व नवीन आव्हानांची चर्चा करणारा डॉ. श्रीकांत सुसर यांचा लेख - संपादक*

नव्याने येऊ घातलेले राष्ट्रीय शिक्षण धोरण एकूणच शिक्षणव्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणणार आहे. कस्तुरीरंगन समितीने सादर केलेला हा मसुदा अनेक सकारात्मक बदल करणारा आणि आश्वासक वाटत असला तरी राजकीय इच्छाशक्तीचा अभाव, अंमलबजावणीतील अडथळे आणि शिक्षणाकडे सत्ता संधारणाचे साधन म्हणून पाहण्याची वृत्ती त्याच्या यशस्वीतेबद्दल साशंकता निर्माण करते. हे धोरण लागू होण्यापूर्वी त्यावर साधकबाधक चर्चा व्हावी असे अपेक्षित आहे. मात्र इतर महत्त्वाच्या विषयांप्रमाणेच ही बाबही दुर्लक्षितच राहिली आहे. शिक्षण क्षेत्रातील सहभागी घटकांनी तरी ह्या धोरणाकडे डोळसपणे पाहावे ह्यासाठी हा प्रयत्न.

शिक्षण सर्वसमावेशक, विद्यार्थीकेंद्री, व्यवसायाभिमुख, कौशल्याधारित, मूल्यवर्धन करणारे आणि सर्वांगीण विकास साधणारे असावे यासाठी प्राथमिक अस्वस्थेपासूनच बदल करण्यात आलेला आहे. शालेय शिक्षणातील यापूर्वीचा १०+२ हा आकृतिबंध पूर्णपणे बदलून त्याऐवजी ५+३+३+४ (वय वर्षे ३-८ फौंडेशनल,९-११ प्रीपेरेटरी, १२ -१४ मिडल आणि १५-१८ सेकंडरी) अशी रचना करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षणाची सुरुवात वयाच्या तिसऱ्या वर्षापासून व्हावी असे अपेक्षित आहे. Early Childhood Care and Education धोरणांतर्गत मुलांचा सर्वांगीण विकास घडवणारा अभ्यासक्रम आणि अध्यापनपद्धतीबाबत आराखडा तयार करण्याची जबाबदारी NCERT कडे देण्यात आली आहे. या अभ्यासक्रमांमध्ये भारतीय परंपरेतील कला, कथा, कविता, गाणी, यांचा समावेश करण्यात येणार आहे. ५ वर्षाखालील सर्व मुलांना प्रिपरेटरी (बालवाटिका) वर्गात प्रवेश दिला जाईल. तसेच त्यांना मध्यान्ह पोषण आहार आणि आरोग्य तपासणी सुविधा पुरविण्यात येतील.

अध्ययन अध्यापन पद्धतीमध्ये पारंपरिक शैक्षणिक साधनांचा वापर करण्याऐवजी तंत्रज्ञानाधारित आणि डिजिटल साधनांचा वापर करण्यावर भर दिलेला आहे. देशातील दुर्गम भागात आणि दुर्लक्षित क्षेत्रात, तसेच दुर्बल घटकांना त्याचा कितपत उपयोग करता येईल किंवा फायदा होईल याबद्दल अस्पष्टता आहे. त्यानिमित्ताने बालवाटिका किंवा अंगणवाडीचा समावेश शिक्षण व्यवस्थेच्या कक्षेत आणण्याचा प्रयत्न आहे. त्यासाठी अंगणवाडी सेविकांना प्रशिक्षित करणे आणि परिसरातील स्वयंसेवकांना त्यात सहभागी करून घेणे अशी शिफारस केलेली आहे. अतिशय कमी वेतनावर आणि कारकुनी कामात गुंतवलेले अंगणवाडी सेवक ही जबाबदारी कसे पेलणार किंवा अर्धपोटी बेरोजगार तरुण स्वयंसेवक म्हणून कसे पुढे येणार हे प्रश्न मात्र अनुत्तरित आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत साक्षरता आणि अंकगणिताचे शिक्षण देण्याचा प्रयत्नही स्तुत्य आहे त्यासाठी स्थानिक भाषेतील शिक्षकांची नेमणूक करण्याचा आणि विद्यार्थी शिक्षक प्रमाण ३०:१ करण्याचे सुचविण्यात आले आहे. तसेच सहविद्यार्थ्यांच्या मदतीने शिकविण्याचा पर्याय सुद्धा वापरला जाणार आहे (peer turtoring), स्थानिक भाषेत अनुवादित पुस्तकांच्या उपलब्धतेवर भर दिला जाणार आहे. पण त्याआधी शिक्षक भरतीमध्ये

---

आळशी माणूस शुभ दिवसाची वाट बघत असतो आणि जो कष्ट करतो
त्याच्यासाठी प्रत्येक दिवस शुभ असतो.

पारदर्शकता आणण्याची आणि कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी शिक्षक भरण्याची गरज आहे. शिक्षकांना अ-शैक्षणिक कामातून मुक्त करणे अत्यन्तिक गरजेचे आहे. त्याबाबतचा उल्लेख मसुद्यात असला तरी अ-शैक्षणिक कामांचे स्वरूप स्पष्ट नाही.

विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी करणे आणि शिक्षणाची कवाडे सर्वांसाठी खुली करणे यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. प्राथमिकपासून उच्च माध्यमिक वर्गात जाईपर्यंतचे विद्यार्थीगळतीचे प्रमाण सध्या ३४% एवढे आहे. ६ ते १७ वयोगटातील ३.२२ कोटी मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे ध्येय आहे. पूर्वप्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत विद्यार्थी नोंदणीचे एकूण प्रमाण २०३० पर्यंत १०० % करण्याचे उद्दिष्ट आहे.

विद्यार्थी गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि नवीन शाळांची उभारणी करणे असे पर्याय योजले तरी त्यासोबतच प्रवेश शुल्काबाबत नियमन करणे, पालकांचे समुपदेशन करणे, शासकीय शाळांबाबत विश्वासार्हता निर्माण करणे ह्या पर्यायांचा विचार करणे गरजेचे आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय अभ्यासक्रम आणि अध्यापन पद्धतीमध्ये काही महत्त्वाचे बदल केले जातील; जसे की घोकंपट्टी प्रकारच्या शिक्षणाला छेद देत बौद्धिक, कौशल्याधारित आणि मूल्य शिक्षणाची सांगड घालणे, अभ्यासक्रमाची व्याप्ती कमी करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशील विचार प्रक्रियेला चालना आणि वाव देणारे घटक अभ्यासक्रमात समाविष्ट करणे इ. वार्षिक परीक्षा पद्धतीऐवजी सुधारणेस वाव देणारी नियमित मूल्यमापन (formative assessment) पद्धतीचा स्वीकार केला जाईल. विद्यार्थ्यांना विषयनिवडीचे स्वातंत्र्य ही विशेष सुधारणा म्हणायला पाहिजे. कला, वाणिज्य, विज्ञान ह्या ज्ञानशाखांमधील विभक्तपणा संपवून आंतरविद्याशाखीय शिक्षणाची कवाडे खुली करण्यात आली आहेत. त्या निमित्ताने अभ्यासक्रम, अभ्यासक्रम पूरक आणि अभ्यासक्रमबाह्य हा भेदही संपणार आहे. ह्या सुधारणा अंमलात आणत असताना काही गोष्टींची पूर्वतयारी करणे गरजेचे आहे; जसे की मूल्यशिक्षण आणि व्यवसायाभिमुख शिक्षणासाठी सर्वप्रथम शिक्षकांना अभिमुख करणे, नियमित मूल्यमापन पारदर्शी होण्याबाबत काळजी घेणे इ. तरीही या नवीन बदलांचे भवितव्य शिक्षक किती प्रामाणिकपणे काम करतो आणि त्याला शिक्षणव्यवस्थेकडून किती शैक्षणिक स्वातंत्र्य मिळते यावर अवलंबून असेल.

बहुभाषिकतेवर भर हा मुद्दा मात्र वादातीत नाही. विद्यार्थ्यांनी बहुभाषिक होण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यातून त्यांचा बौद्धिक विकास साधने हे आदर्शवत वाटत असले तरी प्रत्यक्षात येणाऱ्या समस्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. शिकवताना साधन भाषा म्हणून स्थानिक भाषा वापरणे व त्यासाठी स्थानिक भाषेतील शिक्षक नेमणे, क्रमिक पुस्तके स्थानिक भाषेत उपलब्ध होणे, स्थानिक भाषा येणारे शिक्षक भाडेतत्त्वावर नेमणे ह्या गोष्टी साध्य करणे कठीण आहे. स्थानिक भाषा शिकवणारे शिक्षक पाहिजे तेथे पाठवणे हे शिक्षकांच्या वारंवार होणाऱ्या बदल्या कमी करण्याच्या धोरणाच्या परस्परविरोधी आहे. स्थानिक भाषांच्या स्पर्धेमध्ये संस्कृत एवढाच दर्जा इतर भाषांनाही मिळेल याबद्दल शंका आहेच.

शिक्षक भरती आणि पदोन्नती बाबत काही महत्त्वाचे बदल प्रस्तावित आहेत; जसे की चार वर्षांचा बी.एड. पदवी अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षक पात्रता चाचणी (TET) सक्षम आणि प्रभावी करणे इ. परंतु त्याआधी पात्र विद्यार्थ्यांना नोकरीत सामावून घेणे; तसेच पात्र विद्यार्थी आणि रिक्त जागा यांचाही मेळ घालावा लागेल. शिक्षकांना निरोगी शैक्षणिक वातावरण मिळण्यासाठी केवळ पायाभूत सुविधा देणे पुरेसे नाही. त्यांना अ-शैक्षणिक कामातून मुक्त करणे, त्याआधी अशा अ-शैक्षणिक कामांची व्याख्या स्पष्ट करणे, शिक्षकांना

स्थैर्य देणे या बाबींचा गांभीर्याने विचार करावा लागेल. शिक्षकांच्या व्यावसायिक विकास कार्यक्रमांतर्गत ऑनलाईन कार्यशाळांमध्ये शिक्षकांना वार्षिक ५० तासांचा सहभाग अनिवार्य असेल; तसेच पदोन्नतीसाठी आणि वेतनवाढीसाठी गुणवत्तेचा निकष लावला जाईल. सर्वच शिक्षकांना ऑनलाईन साधनांची उपलब्धता होणे कठीण आहे. त्यातून समान संधीचा मुद्दा उपस्थित होतो. वैयक्तिक गुणवत्तेचा थेट संबंध पगारवाढीशी जोडण्याने शिक्षक आत्मकेंद्री होण्याचाही धोका निर्माण होतो.

समग्र शिक्षा योजने अंतर्गत (पूर्वीचे सर्व शिक्षा अभियान) सर्व घटकांपर्यंत शिक्षण पोचवण्यात यश आलेले असले तरी त्यामुळे अनेक लहान शाळा निर्माण झाल्यात, ज्यामध्ये २८% शाळांमध्ये ३० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत आणि १,०८,०१७ एकशिक्षकी शाळा आहेत. अशा शाळा प्रशासकीय आणि गुणवत्तेच्या दृष्टीने पूर्ण क्षमतेने चालवणे शक्य होत नाही. त्यासाठी शाळा संकुल (School Cluster) तयार केले जातील ज्यामध्ये एक माध्यमिक शाळा आणि परिसरातील इतर छोट्या प्राथमिक व पूर्व प्राथमिक शाळांचा समावेश असेल. त्यातून कला, क्रीडा, व्यावसायिकशिक्षण परिणामकारकपणे देता येईल हे उद्दिष्ट आहे. असे संकुल बालभवन उभारतील आणि विद्यार्थ्यांना कला, क्रीडा, व्यवसायाविषयक विशेष मार्गदर्शन करतील. काही शाळा अध्यापनेतर वेळेत सामाजिक चेतना केंद्र म्हणून सामाजिक उपक्रम राबवतील जेणेकरून शिक्षणसंस्था आणि समाज व्यवस्था यात समन्वय प्रस्थापित होईल. या शैक्षणिक संकुलांचे नियमन जिल्हा शिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी करतील. संघवृत्तीने कार्य करण्यासाठी एक शासकीय आणि एक खाजगी शाळा अशी जोडी केली जाईल ज्यातून एकमेकांना मार्गदर्शन आणि नवीन कल्पना मिळतील. अशा शाळा संकुलासाठी पायाभूत सुविधा उभ्या करणे, सर्व कार्यरत शिक्षकांना त्यात सामावून घेणे याबाबत धोरण ठरवणे आव्हानात्मक असेल.

शालेय शिक्षणातील गुणवत्तेची मानके निर्धारित करण्यासाठी नियामक संस्थांचे विकेंद्रीकरण केले जाईल. शालेय शिक्षण विभाग धोरण निश्चिती करणारी सर्वोच्च संस्था असेल तर शैक्षणिक कार्य आणि नियमन शिक्षण संचालनालयामार्फत केले जाईल. शाळांचा गुणात्मक दर्जा राखण्यासाठी आणि तपासण्यासाठी स्टेट स्कूल स्टँडर्ड ऑथॉरिटी (SSSA) ह्या स्वतंत्र संस्थेची निर्मिती केली जाईल. त्याद्वारे शाळांतील पायाभूत सुविधा, सुरक्षितता, शिक्षक संख्या, आर्थिक व्यवहारातील पारदर्शकता आणि प्रभावी प्रशासन याबाबत खातरजमा केली जाईल.

शैक्षणिक कामकाजात आणि आर्थिक व्यवहारात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी सर्व शाळा-संकुलांना आपापल्या संकेत स्थळांवर संबंधित माहिती सादर करावी लागेल. गुणात्मक दर्जा राखण्यासाठी नियामक संस्थांचे विकेंद्रीकरण ही उपयुक्त कल्पना असली तरी त्यांतील प्रामाणिकपणाचा अभाव त्याना निष्प्रभ करू शकतो. उच्च शिक्षणात NAAC या संस्थेस जे कर्मकांडाचे स्वरूप आले ते SSSA या संस्थेस येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणू पाहणारे बदल ही वर्तमान काळाची गरज आहे यात शंका नाही; परंतु शब्दांना कृतीची जोड मिळाल्याशिवाय ते शक्य होणार नाही. प्रस्तावित बदल प्रत्यक्षात आणायचे असतील तर निश्चित असा कृती आराखडा तयार करावा लागेल. राजकीय इच्छाशक्ती आणि शिक्षणक्षेत्रातील सर्व सहभागी घटकांचे प्रामाणिक प्रयत्न यातूनच हा बदल घडू शकेल.

**- डॉ. श्रीकांत सुसर**
सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग
कला वाणिज्य महाविद्यालय सात्रळ
तालुका लोणी, जिल्हा पुणे
भ्रमणध्वनी - ९८९०५१९६६७

# ज्ञानेश्वरी
## (अध्याय : १)

*माउली ज्ञानेश्वर महाराज रचित भावार्थदीपिकेचा पहिला अध्याय – संपादक*

श्री पैठण क्षेत्री निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर महाराज, सोपानकाका, आदिशक्ती मुक्ताबाई यांना शुद्धीपत्र मिळाले. ते घेऊन ही भावंडे दरकोस, दरमुक्काम करीत नेवासे गावी पोहोचली. मोहिनीराजाचे दर्शन घेऊन प्रवरातीरावर आली. तेथे एक प्राचीन शिवमंदिर आहे. माउलींनी रेड्यामुखी वेद बोलविले ही वार्ता तोपर्यंत सगळीकडे पसरली होती. अनेक लोक दर्शनासाठी येत. ज्ञानदेवांचे कीर्तन ऐकत, पण वरवर शांत दिसणारा सारा समाज बहिर्मुख झाला होता. जातीपातीच्या भिंती गडद झाल्या होत्या. पंडितांची सारी शास्त्रे मुखोद्गत होती. पण अध्यात्मशास्त्र कुणीही जाणत नव्हते. नाना दैवते, नाना उपासना यातच सारी बुडून गेली होती. सृष्टीकर्त्यांच्या अस्तित्वाचे कुणालाच भान नव्हते.

हे सारे पाहून सद्गुरू निवृत्तीनाथ ज्ञानेश्वर महाराजांना म्हणाले, 'ज्ञानदेवा या सैरभैर झालेल्या समाजाला दिशा दाखवण्याचे काम तुला करावे लागेल. भक्तीचा ज्ञानदीप उजळावा लागेल. तू भगवद्गीता प्राकृतात प्रकट कर.' जी अर्जुनाला कर्तव्य परायण करण्यासाठी ऐन युद्धभूमीवर श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली. यावर विनयाची जणू मूर्तीच ते ज्ञानदेव म्हणाले, 'गुरुमहाराज गीतेवर टीका मला जमेल का?'

श्रीगुरुनिवृत्तीनाथांनी आपला उजवा हात माउलींच्या मस्तकावर ठेवला व सांगितले 'जमेल, करा'. तसं माउलींनी या ग्रंथाला 'धर्मकीर्तन' म्हटले आहे. पण समाजात या ग्रंथाचं नाव ज्ञानेश्वरीच आहे. तसं तर भगवद्गीतेवर अनेकांनी टीका लिहिल्या. पण ज्ञानेश्वरीची बरोबरी कुणाशीही होऊ शकणार नाही. ज्ञानेश्वरी स्वतंत्र ग्रंथही आहे. ज्ञानेश्वरीचा महिमा अलौकिक आहे.

प्रवरातीरावरील त्या शिवमंदिरात प्रशस्त ओवरी. त्या ओवरीत एक दगडी खांब. त्या खांबाला टेकून माउली ज्ञानेश्वर महाराज बसले आणि ज्ञानगंगा वाहू लागली.

**ॐ नमोजी आद्या। वेदप्रतिपाद्या।**
**जय जय स्वसंवेद्या आत्मरूपा।।१।।**

ओंकार स्वरूप गणेशाला वंदन झालं.

आता अभिनव विलासिनी म्हणून शारदास्तवन झालं. मज हृदयी सद्गुरू। इथून सुरू झाला गुरुमहिमा, गुरूस्तवन. माउलींची गुरुभक्ती अलौकिक आहे. माउली म्हणतात –

**म्हणोनि जाणतेने गुरू भीजजे। तेणे कृतकार्य होईजे।।**
**जैसे मुळसिंचने सहजे। शाखा पल्लव संतोषती।।२५।।**

ही ओवी अध्यात्मशास्त्राचा पायाच आहे. सद्गुरूसेवेचा महिमा प्रत्येक संतांनी सांगितला आहे. गोंदवलेकर महाराजांनी त्यांच्या प्रवचनांत गुरूसेवेचे महत्त्व सुंदर रीतीने व सतत सांगितले आहे. माउलींनी ही ओवी पहिल्याच अध्यायात सांगून भक्ती शास्त्राचा पाया कसा बळकट करावा हे सांगितले आहे. माउली म्हणतात, माझ्या श्रीगुरुंच्या कृपासामर्थ्याने मी ही कथा सुरू करीत आहे.

---

उजेडणारी प्रत्येक सकाळ तुम्हाला दोन पर्याय देऊन जाते, झोपून स्वप्न पाहत राहा किंवा उठून स्वप्नांचा पाठलाग करा. पर्याय आपणच निवडायचा असतो!

नंतर महाभारताचे महत्त्व माउलींनी सांगितले. श्रोत्यांना वंदन करून गीतेचं श्रवण कसे करावे हे सांगितले. हे शब्दविण संवादिजे। इंद्रिया नेणता भोगिजे।।

माउलींनी गीतेचं माहात्म्य सांगितलं.

धृतराष्ट्र उवाच :

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे। समवेता युयुत्सवः**

धृतराष्ट्र संजयाला (संजय हा व्यासांचा शिष्य आहे. त्याला महर्षी व्यासांनी अशी दूरदृष्टी दिली होती की तो हस्तिनापुरात बसून कुरुक्षेत्रावरील सर्व वृत्तांत महाराज धृतराष्ट्रांना सांगणार होता.) विचारतात की, 'कुरुक्षेत्रावर युद्धासाठी गेलेले माझे पुत्र व पंडुपुत्र सध्या काय करीत आहेत?'

संजयाने युद्धभूमीवर घडणाऱ्या घटनांचे वर्णन केले. युद्धाला जमलेल्या महारथी वीरांचे, सैन्यदलांचे वर्णन केले.

त्या युद्धभूमीवर अर्जुन श्रीकृष्णांना (श्रीकृष्ण अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करीत होते) म्हणाला की 'देवा माझा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी नेऊन उभा कर.'

त्या रथातून अर्जुनाने पाहिले तर समोर सगळी आपलीच माणसे. पितामह भीष्म, गुरू द्रोणाचार्य, कृपाचार्य, अश्वत्थामा, दुर्योधन या सगळ्यांकडे पाहून अर्जुनाचे मन बावरून गेले. आपल्याच कुळातील लोकांना मारायचे या कल्पनेने त्याचा धीर सुटला. गांडीव धनुष्य हातातून गळू लागले. तोंडाला कोरड पडली. माउली म्हणतात,'ज्या अर्जुनाने युद्धात शंकरालाही जिंकले तो अर्जुन क्षणात मोहग्रस्त झाला.'

तो बोलू लागला, 'हे देवा या लोकांना मी कसे काय मारू? अरे या सैन्यात ज्यांनी आमच्यावर अनंत उपकार केले ते पितामह भीष्म आहेत, गुरू द्रोण आहेत यांना मारण्याचा मी नुसता विचार जरी केला तरी ते महापातक आहे. असे असताना मी या गोत्रजांचा वध केला तर माझा पुण्याचा ओलावा संपून मी अत्यंत दोषी होईन. माझ्या या पापामुळे अनंत जन्मींच्या पुण्याइने प्राप्त झालेला तुही आम्हाला सोडून निघून जाशील आणि तू निघून गेलास तर मी ते कदापिही सहन करू शकणार नाही.'

'कौरव अहंकाराने उन्मत्त होऊन युद्धाला आले असले तरी आम्हाला आपले हित कशात आहे ते पहावेच लागेल. देवा आपणच आपल्या कुळाचा नाश केला तर कुलक्षय होईल. सनातन धर्म नाहीसा होईल, एवढेच काय पितरांचेही पतन होईल.'

'तेंव्हा देवा हे युद्ध मी करणार नाही, या युद्धात मिळालेले राज्यही मला नको. माझा कौरवांनी वध केला तरी चालेल, पण हे पापकर्म मी करणार नाही.' असे बोलून अर्जुन रथातून खाली उतरला. त्याने धनुष्यबाण टाकून दिले.

अर्जुनाचे असे वागणे पाहून श्रीकृष्ण त्याला कशा प्रकारे बोध करतील ती कथा पुढच्या अध्यायात पाहू.

**– भाग्यश्री कुलकर्णी**

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

ऊन एकटं कधीच येत नाही, ते सावलीला घेऊनच येतं. दु:खाचं अन् सुखाचं हेच नातं असतं!

# कलम ३७० आणि ३५अचे वर्षश्राद्ध

*कलम ३७० रद्द करण्यात आले. कलम ३७० रद्द करण्याआधी व नंतरची परिस्थिती या लेखात विशद करण्यात आली आहे - संपादक*

काश्मीरला स्वत:ची विशेष अशी सांस्कृतिक ओळख असली तरी भारतापासून वेगळी राजकीय ओळख देण्याच्या कुठल्याही गोष्टीला देशातील राष्ट्रवादी नागरिकांचा विरोध राहिला आहे. काश्मीरचे वेगळे संविधान, वेगळा ध्वज, वेगळा पंतप्रधान हे प्रथम पासून राष्ट्रवादी नागरिकांसाठी मतभेदाचे मुद्दे राहिले. जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शामाप्रसाद मुखर्जी यांनी त्यासाठी बलिदान केले. प्रथम जनसंघ, आता भाजप या पक्षाने आणि त्याच्याशी संलग्न विविध क्षेत्रांतील संघटनांनी अगदी पहिल्यापासून भारतापासून काश्मीरला वेगळे काढणाऱ्या कलम ३७०ला विरोध दर्शविला आहे. भारतातील इतर पक्षांनी या बाबत पहिल्या पासून मौन धरले आहे. वेळच आली तर मुसलमानांच्या मतांवर नजर ठेवत विरोधात मत नोंदविले आहे. भाजप प्रत्येक निवडणुकींच्या जाहीरनाम्यांमधे कलम ३७० रद्द करण्याची ग्वाही देत आलेला आहे. २०१३ मधे मोदी २०१४च्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजपचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील हे ठरल्यानंतर मोदींनी देशभर प्रचार दौरे करण्यास सुरवात केली. या दरम्यान कलम ३७०वर पुनर्विचार झाला पाहिजे हा मुद्दा मोदी सातत्याने मांडत असत.केंद्रात २०१४त भाजप बहुमताचे सरकार आले. भाजपने जम्मू-काश्मीर मधील सहा पैकी ३ लोकसभेच्या जागा जिंकल्या; ३३ टक्के मते मिळवून मुसंडी मारली. केंद्रात सत्ताबदल होताच, भाजपची ३७० बद्दलची प्रथमपासूनची भूमिका लक्षात घेऊन ओमर अब्दुल्लांनी धमकी दिली. मोदींनी जर ३७० कलम रद्द करण्याचे ठरविले तर ते जम्मू-काश्मीर भारतापासून तोडण्याचे दोषी ठरतील (द हिंदू ८ मे २०१४). मागाहून ओमरना शहाणपण सुचले. काश्मिरी पंडितांना परत वसविण्याच्या दृष्टीने प्रधानमंत्री कोशातून ५८०० कोटी रुपयांची तरतूद केली गेली. त्यात पंडित समुदायाची दुरवस्थेतील घरे सुधारणे, त्यांच्या नव्या वसाहती करणे, त्यांना सुरक्षा प्रदान करणे, रोजगार उपलब्ध करणे समाविष्ट होते (द हिंदू १३ जून २०१४). डिसेंबर २०१४त झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ३७० कलमाचा मुद्दा उचलून धरला होता. निवडणुकीनंतर सर्व रंगच पालटला. पीडिपीचे काश्मीरात तर भाजपचे जम्मू, लडाख भागात अधिक उमेदवार निवडून आले. मतदानाचा कल धर्मनिहाय राहिला. स्पष्ट बहुमता अभावी भाजपने पारंपरिक प्रतिस्पर्धी पीडिपीशी सहकार्य करून मुफ्ति मुहंमद सईदना मुख्यमंत्री स्वीकारून सत्तेत भागीदारी केली.मुफ्ति मुहंमद सईद मुख्यमंत्री असताना मोदींनी काश्मीरला सप्टें. २०१५त सदिच्छा भेट दिली.भाजपशी हातमिळवणी केली म्हणून अनेकांनी सईद यांना टिकेचे लक्ष्य केले तरी त्यांनी माघार घेण्यास सपशेल नकार दिला (द. हिंदू २२ आक्टो. २०१५).

मु.म.सईद यांनी कळत न कळत अलगाववादाला बळ दिल्याचे भूतपूर्व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एम. के. नारायणन यांनी स्पष्टपणे नमूद केले (द हिंदु २४ नोव्हें २०१५). सईद कालवश झाल्यावर काही काळ संभ्रमात घालवून तेच धोरण मेहबुबा मुफ्तिंनी पुढे चालू ठेवले.मोदी २०१९ मधे अधिक मताधिक्क्याने लोकसभेवर निवडून आले. त्या निवडणुकीत पीडिपीचा एकही उमेदवार

आला नाही, नॅशनल काँग्रेसचे तीन उमेदवार निवडून आले. भाजपला ४६.४ टक्के मते मिळून १२ टक्के वाढ झाली.जनमताचा कौल स्पष्ट झाला.मेहबूबांची धरसोड वृत्ती लक्षात घेऊनही २०१५त त्यांच्याशी जुळवून घेणे यात तात्पुरती तडजोड असली तरी देशहिताच्या दृष्टीने भाजपचे ते सकारात्मक पाऊल होते.

**अतिरेक्यांचे आर्थिक लागेबांधे**

गाझा पट्टीत इस्रायल विरोधात पॅलेस्टीनी तरुणांनी 'इंतेफादा' असे ओळखले जाणारे दगडफेकीचे तंत्र आरंभले होते. ते पाहून २००८-९च्या दरम्यान काश्मीरातही तेच तंत्र अवलंबिणे सुरू झाले. पीडिपी-भाजप संयुक्त प्रशासन काळात २०१६-१७च्या दरम्यान काश्मीरी तरुणांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून लष्करावर दगडफेक करण्याचे प्रमाण हाताबाहेर गेले. त्याचे लोण गावागावांमधून पसरले. तसे पाहिले तर काश्मीरी लोक पर्यटकांचे चांगले आदरातिथ्य करण्यासाठी प्रसिद्ध आहे. अमरनाथ आणि इतर यात्रांचे तंत्र काही वर्षांपासून बिघडले. अमरनाथ यात्रा सुरळीत पार पडणे हे त्यावेळी आणि आताही मोठे दिव्य असते. २०१७तील स्थिती गोंधळाची होती. एकीकडे सईद गिलाणी यात्रेकरू आमचे पाहुणे आहेत, त्यांना कुठलीही समस्या येणार नाही अशी ग्वाही देत होते (इं. ए. २० जून १७) तर जुलै महिन्यात यात्रेकरूंच्या बसवर हल्ला करण्यात आला. त्या हल्ल्याचा सुत्रधार लष्कर-ए-तैबाचा कमांडर अबू इस्माइल याचा माग काढून लष्कराने त्याच्या पाकिस्तानी सहकाऱ्यासह त्याला ठार मारले. तो श्रीनगर बाहेर लष्कराच्या छावणीवर हल्ला करण्याची योजना आखत होता (टा.ऑ.इं. १५ सप्टें). या प्रकारातून पाकिस्तानचा अतिरेकी हल्ल्याशी आणि आर्थिक पाठबळाशी संबंध प्रकर्षाने पुढे झाला.

**चौकट क्र. १**

**परकीय मदतीचा ओघ**

काश्मीरात दंगेखोरांनी पैसे घेऊन दंगे करणे नवे नाही. वजाहत हबिबुल्ला एक जाणते प्रशासकीय अधिकारी होते. ते १९७०च्या दशकात काश्मीरमधे रुजू झाले आणि अनेक वर्षे काश्मीरमधेच प्रशासकीय सेवेत होते. ते काश्मीरसंबंधात तज्ज्ञ समजले जातात. ते वृत्तपत्रांमधून अनेकदा मतप्रदर्शन करतात. त्यांचे "My Kashmir : The dying of the light, Penguin Books, 2014" हे पुस्तक तटस्थ भूमिकेतून लिहिल्याचे जाणवते. ते काश्मीर प्रशासनात असताना १९८६ दरम्यान हिंदू पंडित समुदाया विरोधात अनंतनागमधे जोरदार दंगे, जाळपोळ झाली होती. खुद्द मुफ्ती मोहंमद सईदच्या गावी दंगे करणारे सगळे कार्यकर्ते काँग्रेसचे होते. दंगे करण्यासाठी त्यांना प्रत्येकी शंभर रुपये देण्यात आल्याचे हबिबुल्ला लिहितात (उपरोक्त पृ. ६५) २०१०-२० या दशकात काश्मीरी तरुणांनी रस्त्यावर उतरण्याचे कारण वाढलेला वहाबी इस्लामचा प्रभाव (उपरोक्त पृ. २), त्यांचा लष्कराबाबत सामूहिक संताप, बेराजगारी बरोबरच दगडफेकीनंतर रोजंदारीवर काही नेत्यांकडून मिळणारा पैसा होते. पाकिस्तानकडून दर वर्षी शेकडो करोडोंच्या आर्थिक मदतीचा तपास घेण्याचे काम केंद्राने सुरू केले. पाकिस्तानी आर्थिक मदतीचा ओघ हवाला मार्गे काही नेते आणि व्यापारी यांच्या पर्यंत पोहोचत होता.अतिरेक्यांना देशाबाहेरून आर्थिक मदत मिळत होती हे उघड गुपित होते. भाजप केंद्रात सत्तेत आल्यावर त्या विरोधात ठोस कारवाया होण्यास सुरवात झाली.राष्ट्रीय सुरक्षायंत्रणेकडून २०१७ पासून तपासाला चालना मिळली. त्याची दिनांकवर माहिती खाली दिली आहे.

४ जून - राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणेने हुरियत कॉन्फरन्सचे सईद अली शहा गिलानी, स्वतंत्र आमदार शेख अब्दुल रशीद आणि खोट्या नोटा चलनात आणल्याच्या संदर्भात

३७ लोकांना अटक केली.

१ जुलै – अतिरेकी कारवायांसाठी सीमेपलीकडून पैसा येतो याचे धागेदोरे मिळाल्यावर रा.सु.यं.ने पाकिस्तानशी चालणारा सामानाच्या अदलाबदलीतून चालणारी देवाणघेवाण (Barter trade) बंद करण्याचे सुचविले होते. कमी किंमतीच्या भारतातील वस्तूंच्या बदल्यात त्याचप्रमाणात अधिक किंमती वस्तू पाकिस्तानातून पाठवून मिळणारा नफा राजरोसपणे दगडफेकीसाठी देता येत असे. तो व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांची एलओसी ट्रेडर्स असोसिएशन आहे. तीचा अध्यक्ष आणि काही व्यापाऱ्यांवर रा.सु.यं.ने धाडी टाकल्या होत्या.त्या विरोधात स्थानिक व्यापाऱ्यांनी बंद पुकारला होता.

१६ जुलै – माजी आमदार अब्दुल रहीम राठरचा मुलगा हिलाल राठर याच्या घरी आयकर विभागाने जे–के बँकेत आर्थिक घोटाळा प्रकरणी धाड टाकली. रिझर्व्ह बँकेने जे–के बँकेचे हिशोब तपासायला घेतले.

३० जुलै – रा.सु.यं.ने निवेदन प्रसिद्ध केले की हज यात्रेसाठी विमान प्रवासातील शासनाने दिलेली सूट, सीमेपार चालणारा वस्तू विनीमय असे मिळून दोन हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची उलाढाल अतिरेकी कारवायांसाठी वापरली जाते. हज यात्रा घडवून आणणारे एजंट यात सहभागी असतात. एजंटांच्याकडून ठिकठिकाणी दगडफेक करणाऱ्यांना रोख रकमा दिल्या जातात.

१९ ऑ. – काश्मिरी व्यापारी झरूर वातालीला अतिरेक्यांना पैसे पुरविल्याच्या आरोपावरून रा.सु.यं.ने अटक केली. गिलानीचा जावई आणि इतर सहा लोकांना त्याच संदर्भात अटक झाली होती.

२५ ऑ. – इं.ए.ने पृ. क्र १० वर अतिरेक्यांना मिळणाऱ्या अवैध पैशांच्या व्यवहारात गुंतलेल्या संघटना आणि त्यांना सामील असलेले वकील, झरूर वाताली सारखे व्यापारी, हुरियत कॉंफरन्स अध्यक्ष गिलानीसह इतर पदाधिकारी आणि जवळचे नातेवाईक अशांची व्यक्तिगत माहिती प्रसिद्ध केली.

२४ सप्टें. – फुटिरतावादी मुखंड शब्बीर शहाने पाकिस्तानातील अतिरेकी हाफीज सईदशी जाने. २०१७त संपर्क करून हवाला मार्गे पैसा मिळाल्याची कबुली दिली.

२६ सप्टे. – तरुणांनी लष्करावर दगडफेक करण्याच्या घटनांमागील आर्थिक सहाय्याच्या तपासात काश्मीर विद्यापीठाच्या आला फाजील या पीएच. डी. विद्यार्थ्याची तपासणी करण्यात आली.

२९ सप्टें – स्थानिक व्यापारी वाताली याने स्वतंत्र आमदार शेख अब्दुल रशिदला हवालामार्गे आलेल्या रकमा पोहचविल्याच्या संशयातून दोघांचीही चौकशी करण्यात आली.

२ ऑक्टो. – हुरीयत कॉंफरन्सचा नेता, सईद अली शहा गिलानी याचा अतिरेक्यांना आर्थिक मदत पोहचविण्यात हात असल्याचा ठोस पुरावा हाती आल्याची माहिती रा.सु.यं.ने दिली.

१९ जाने २० – पाकिस्तानी वकिलातीतील काही कर्मचारी अतिरेक्यांना पैसे पुरवितात याची कबुली काही आरोपींनी चौकशी दरम्यान दिल्याने या तपासाला वेगळे वळण लागले.

सईद अता हुसेन हे भूतपूर्व लष्करी अधिकारी असून ते काश्मीर प्रश्नावर बरेच वेळा मत नोंदवितात. अतिरेक्यांना मिळणाऱ्या आर्थिक मदती बाबत त्यांनी स्पष्ट कल्पना दिली होती. फुटिरतावाद्यांचे संपर्काचे जाळे घट्ट विणलेले आहे. ते अगदी एकेक कस्बा–मोहल्ला गावागावात पसरले आहे. स्थानिक बुद्धिजीवी,

वकील, दगडफेक आणि हुल्लडबाजी करण्यास सोकावलेले, व्यसनी आणि प्रत्यक्ष हल्ले करणारे अतिरेकी अशा सर्वांना हा पैसा पुरविला जातो. या वरच्या कमाईवर ते जगतात. दगडफेक करणाऱ्यांना रोजंदारीने पैसे पुरवाले जातात (टा.ऑ.इंडिया ५ ऑ. २०१७). ही घटना दिनांक ३७० कलम रद्द होण्याच्या बरोबर दोन वर्षे पूर्वीची आहे. एवढी सगळी माहिती उपलब्ध असतानासुद्धा रिझर्व्ह बँक आणि रा.सु.यं.ने दोन वर्षे जाऊनही ३६० कलम रद्द करण्याच्या दिवसापर्यंत एकाही आरोपीला न्यायालयात खेचून शिक्षा देवविली नाही. ते झाले असते तर ३७० कलम हटविण्याबाबत एक ठोस कारण संसदेत मांडता आले असते. अजूनपर्यंत एकाही प्रकरणाचा न्यायालयात निकाल न लागल्याने लोकांना रा.सु.यं.वर संशय घेण्यास वाव मिळतो. पैसे घेऊन अतिरेक्यांच्या मदतीला येणाऱ्या स्थानिक देशद्रोह्यांचे हात बळकट होतात. वस्तुत: अशा देशद्रोही कारवाया करणाऱ्यांवर वचक बसविण्यासाठी आवश्यकता असल्यास खास न्यायालये बसवून निकाल दिले आणि आरोपींना शिक्षा मिळण्यास रा.सु.यं.चे दावे बळकट होतील. खाते तपासणी आणि न्यायालयीन दिरंगाईमुळे कशालाच अर्थ उरत नाही.

### ३७० रद्द करण्याविरोधात याचिका

संसदेत बहुमताने संमत झालेल्या विधेयका विरोधातही नागरिकांना न्यायालयात दाद मागता येते हे लोकशाही व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. भारतात ते कारण नसतानाही वापरले जाते. ३७० संदर्भात पीडिपी भाजप संयुक्त सरकारच्या दरम्यान कलम ३७० रद्द करण्या विरोधात राज्याच्या उच्च न्यायालयात एक याचिका दाखल केली गेली. न्यायालयाने निकाल दिला की, ३७० कलम हे संविधानाचा कायम राहणारा भाग आहे. तो वाद सर्वोच्च न्यायालयात गेला. तेंव्हा सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला की, फक्त लोकसभाच ते कलम रद्द करण्याची कारवाई करू शकते (इं. ए. ३१ आक्टो.२०१५). माझा स्वत:चा अंदाज आहे की या निकालाने ३७० कलम लोकसभेत मांडून हटविण्याचा केंद्र सरकारचा मार्ग प्रशस्त केला.

### कलम ३५अ चर्चेत आले

भाजप २०१४त सत्तेत आल्यापासून कलम ३७० बरोबरच कलम ३५अ चर्चेत आले. कलम ३५अ नुसार ज-का.चे स्थायी वास्तव्य (Domicile status) मंजूर करण्याचे अधिकार राज्याच्या विधानसभेला दिले होते. गैर-काश्मिरी भारतीय नागरिकाला काश्मीरमधे जमीनजुमला घेण्याची अनुमती नव्हती. त्याच दरम्यान विशेषकरून जम्मूमधील राखीव वनजमिनी राजकारणी आणि नौकरशहांनी हडपण्याचे प्रकरण बाहेर आले होते. तेथे ठरवून मुस्लिमांना प्राधान्य देऊन प्रस्थापित केले गेले.त्याने जम्मूत हिंदूमते अल्पमतात जातील असे कारस्थान होते. पाकिस्तानातून आणि पाकव्याप्त काश्मिरातून आलेल्या स्थलांतरित हिंदूना नागरिकत्व मिळण्यात कोणत्याच स्थानिक पक्षाला देणेघेणे नव्हते. मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्तिंनी ३५ बाबत केंद्र शासनाबरोबर चर्चा केली त्याच वेळी विरोध करताना धमकी दिली होती की, ते कलम काढल्यास काश्मीरमधे खांद्यावर तिरंगा घेणारा मिळणार नाही.टा.ऑ.इं.ने अग्रलेखात कलम काढण्याच्या विरोधात मत प्रदर्शन केले होते (११ ऑ. २०१७). कलम ३५अ गैरकाश्मिरींशी लग्न करणाऱ्या काश्मिरी, विशेष करून महिलांचा अधिकार नाकारणारे होते. त्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल झाली होती (इं.ए. १५ ऑ. २०१७).भाजपने कलम ३५अचा मुद्दा उचलून धरल्यावर झोपेतून जागे झाल्याप्रमाणे त्यावर काश्मीरमधे सर्वच पक्षांकडून मत प्रदर्शन झाले. मेहबुबा मुफ्ती आणि नव्यानेच राजकीय आखाड्यात उतरलेले पूर्वाश्रमीचे प्रशासकीय अधिकारी शाह फैजल यांनी ३५अ कलमावर सर्वपक्षीय

विचारमंथनाची आवश्यकता प्रतिपादन केली (इं.ए. १ ऑ २०१९).दि ४ ऑ.ला अनेक विरोधी पक्ष नेत्यांनी एकत्र येऊन त्या विरोधात 'गुपकर' मसुदा प्रसिद्ध केला.

एका वर्षापूर्वी कलम ३५अ रद्द झाले. आता वर्ष उलटून गेल्यावर दि. २७ ऑक्टो.ला केंद्र सरकारने काढलेल्या वटहुकुमानुसार कोणत्याही भारतीयाला निवासी प्रमाणपत्राविना काश्मीरमधे जमीन विकत घेता येणार आहे. या वटहुकुमाला न्यायालयात आव्हान दिले जाईल, त्यावर स्थगिली आणली जाईल. त्याचे भवितव्य निश्चित होण्यास वेळ लागेल; पण काश्मीर भारतात सामावून जाण्याच्या दिशेने वाटचाल करतो आहे. त्या मागे सध्याच्या केंद्र सरकारचे निश्चित धोरण दिसते. यात दोन गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. असे घडू शकते की, जमीन खरेदी-विक्री व्यवहारात स्थानिक माफिया वरचढ ठरून राजरोसपणे कोटींचे व्यवहार करून भारतीयांच्याच पैशाने त्यांना दहशतवाद पोसता येईल. दुसरा महत्त्वाचा मुद्दा काश्मीरची सुंदर वनराई आणि निसर्गसौंदर्य बिल्डर माफिया तात्काळ नष्ट करण्याच्या मागे असेल. त्याला राजकारण्यांची साथ असेल. असे देशात अनेक ठिकाणी झाले आहे. पूर्वी निसर्गसौंदर्यासाठी प्रसिद्ध असलेली अनेक स्थळे आज हॉटेल, रिसॉर्टचे गजबजाट आणि प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहेत. तसे काश्मीरात घडू नये. त्याला आवर घालण्याच्या कलमांचा अंतर्भाव आणि त्यांची कडक अंमलबजावणी करण्याचे मोठे आव्हान स्थानिक जनता, केंद्र आणि राज्य सरकार समोर असेल.

### सामाजिक प्रबोधनावर भर

स्थानिक नागरिकांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाने सकारात्मक पाऊले उचलली. पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी जम्मू-काश्मीरला भेटी दिल्या आहेत. जून २०१९ दरम्यान सचिवालयातील कर्मचाऱ्यांना जनसंपर्कासाठी गावोगावी पाठविण्यात आले. त्यावेळी सुमारे ४५०० ठिकाणी संपर्क अभियान चालविण्याचे लक्ष्य होते. युवकांशी संवाद साधून अतिरेकी कारवाया करण्यापासून त्यांना रोखण्याचा उद्देश होता (ए.टा.१६ जुलै १९). मोदींच्या कार्यशैलीचा तो एक भाग असतो.

### कलमे निष्प्रभ झाली

दि. ५ ऑ. २०१९ला सकाळी संसदेत जम्मू-काश्मीर पुनर्रचना विधेयक सादर झाले. दिवसभर त्यावर उलटसुलट चर्चा झाली. झाडून सर्वपक्षीय सभासदांनी मत प्रदर्शन केले. चर्चेच्या शेवटी गृहमंत्री शहा यांनी विरोधकांच्या एकेका प्रश्नाला धरून उत्तरे देत केंद्र शासनाची बाजू मांडली. त्याच दिवशी ते विधेयक बहुमताने मंजूर झाले. त्या दिवशीचे अमित शहांचे भाषण विधेयकाशी संदर्भात विचारल्या गेलेल्या सर्व शंका-कुशंकांचे निरसन करत सर्वंकष वैचारिक बाजू मांडणारे होते. संसदेत आजवर झालेल्या अत्यंत प्रभावी आणि समतोलपणे विचार मांडलेल्या भाषणांमधे शहांच्या भाषणाची गणना होईल. ही विधेयके रद्द होताच देशात आनंदाचा कल्लोळ उठला. आजवर काश्मीरला भारतापासून वेगळे पाडणारी ही कलमे गैरलागू झाल्याने राष्ट्रवादी नागरिकांनी, तसेच दशकांपासून पाकिस्तानातून शरणार्थी बनून आलेल्या आणि भारतात नागरिकत्वाच्या हक्कांपासून वंचित राहिलेल्या काश्मिरी आणि हिंदू नागरिकांनी जल्लोष केला. लड्डाखमधील नागरिकांची अनेक वर्षांपासून केन्द्रशासित प्रदेश होण्याची मागणी विधेयकाव्दारे पूर्ण झाली. तेही या निर्णयामुळे आनंदीत झाले. लेह आणि कारगिल हे दोन जिल्हे केन्द्रप्रशासीत आहेत. लेह मधे विधेयकाचे स्वागत मोकळेपणाने झाले, तर मुस्लिमबहुल असलेल्या कारगिल जिल्ह्यातील मुस्लिम नागरिकांत त्या विषयी अस्वस्थता होती. ती लक्षात घेऊन कायदा सुव्यवस्था

---

खूप कमी लोक आपल्या आयुष्यात सुख आणि आशीर्वाद घेऊन येतात, पण खूप जास्त लोक आपल्याला कटू अनुभव आणि शिकवण देण्यासाठी येतात!

राखण्यासाठी कारगिल जिल्ह्यात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली. लोकांत अफवा पसरून अशांतता वाढू नये यावर प्रतिबंधक उपाय म्हणून राज्यात दूरध्वनी आणि इंटरनेट सुविधा बंद करण्यात आल्या होत्या (इं.ए. ११ ऑ २०१९).

**प्रत्यक्षदर्शी शताक्षीजी**

शताक्षी पंडित, माझ्या मुलीची नणंद, या औषधीशास्त्रात उच्चविद्याविभूषित आहेत. अनेक वर्षे अमेरिकेत संशोधन करून परतल्यावर त्यांनी सुमारे तीन वर्षांपासून काश्मीरमधे एका शैक्षणिक प्रकल्पात काम करणे सुरू केले. तो प्रकल्प अतिरेकी कारवायांसाठी कुप्रसिद्ध, दोडा जिल्ह्यात, दोडा शहरापासून सुमारे ५० कि. मी. अंतरावर, उंच पठारी भागात चालतो. त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी कच्चा रस्ताही त्यांच्या समोरच बांधला गेला. शताक्षीजी गेल्या वर्षी ऑगस्ट दरम्यान प्रकल्पाच्या ठिकाणीच होत्या. त्यांनी प्रत्यक्षदर्शी माहिती दिल्याप्रमाणे, त्या भागात पूर्वी लष्कर आणि पोलिस दलाचे क्वचित येणे-जाणे असे. मागच्या वर्षी ऑगस्टच्या आधी एकाएकी त्या भागात लष्कर आणि निमलष्करी दलांचे येणे-जाणे वाढले. फार मोठ्या प्रमाणात त्यांची गस्त वाढली. लोकांची झाडाझडती वाढली. काही तरी अभूतपूर्व घडणार आहे याची खूणगाठ लोकांनी मनोमन बांधली होती. संविधानातील कलम ३५अला धरून केंद्रशासन काश्मीरच्या लोकांचा स्थावर मालमत्तेचा विशेषाधिकार काढून घेऊन इतर नागरिकांनी काश्मीरात स्थायीक होणे खुले करेल, त्यामुळे बाहेरचे लोक स्थानिक मालमत्तांवर कब्जा करतील; काश्मीरातील पाक स्थलांतरित हिदुंना नागरिकत्व बहाल करून भाजपची मतपेढी वाढविली जाईल असा लोकांचा होरा होता. दि. ५ ऑगस्टला संसदेतील चर्चेनंतर ३७० आणि ३५अ अशी दोन्ही कलमे रद्द करून जम्मू आणि काश्मीर राज्याचे दोन भागात विभाजन केले. याचा स्थानिक जनतेला मोठा हादरा बसला. १९९०च्या दशकात काश्मीरमधे अतिरेकी कारवाया सुरू झाल्यापासून केन्द्रात कोणत्याही पक्षाचे शासन असले तरी ते काश्मिरींना न्याय्यपूर्ण वागणूक देत नसल्याची भावना होती. तीन दशके लष्कराचे सर्वत्र अस्तित्व सामूहिक अस्वस्थता वाढविणारे होते. तीन दशकांच्या दरम्यान ज्या दोन पिढ्या लष्कराच्या सावटाखाली वाढल्या, त्यांची अस्थिर मानसिकता शताक्षीजींनी प्रत्यक्ष अनुभवली आहे. दि. ५ ऑ.च्या सांसदीय कार्यवाहीने सर्वसामान्य काश्मिरी मुस्लिम नागरिकाचा केंद्र शासनावरील जो काही उरलासुरला भरोसा होता तो पूर्णपणे नष्ट झाला; समाजमन सुन्न झाले असे शताक्षीजींना वाटले. त्याच वेळी फुटिरतावादी नेत्यांबरोबरच अब्दुल्ला पिता-पुत्र, मेहबूबा मुफ्ती आणि राजकीय नेत्यांना घरातच स्थानबद्ध करून लोकांशी त्यांचा संपर्क तोडण्यात आला. केन्द्रशासन जरी काश्मिरींच्या सुरक्षेचे, बाहेरून गुंतविण्यात येणाऱ्या भांडवलाचे, तेथे लौकरच नव्या योजना सुरू करून स्थानिकांच्या प्रगतीचे भव्यदिव्य चित्र रंगवित होते तरी सामान्य काश्मिरी मुस्लिम मात्र हताश झाल्याचे शताक्षीजींना जाणवले. उद्रेगाची संभावना लक्षात घेऊन लष्कराची हडेलहप्पी वाढली. त्या ज्या दुर्गम भागात होत्या तेथेही लष्कराचा वावर वाढला होताच. वाहनांची तपसणी अधिक कडक झाली. तरुणांवर बळजबरी करण्याचे प्रकार वाढले. कुठल्याही गावात शिरण्यापूर्वी गावप्रमुखाची परवानगी लागते. परवानगी घेतली का असे विचारणाऱ्या त्यांच्या संस्थेतील एका तरुणाला शताक्षीजींच्या समोर जवानांनी बुकलून काढल्याचे त्या सांगतात. ते पाहवत नव्हते. त्या ऑगस्ट २०२० मधे घरी परतल्या तोवर काश्मिरातील परिस्थिती जवळपास तशीच होती.

ऑक्टो. २०२० मधे मेहबुबा मुफ्तिंची सुटका झाल्यावर एरवी एकमेकांचे तोंड न पाहणारे काश्मिरी

मुस्लिम नेते केन्द्रशासनाच्या विरोधात एकत्र आलेत हे शताक्षीजींना चांगले लक्षण वाटते. एरव्ही चार दिशांकडे तोंडे असणारे नेते एकत्र बसून विचारविनीमय करतील तर काश्मिरींच्या भल्यासाठी ठोस पाऊले उचलली जातील अशी आशा त्यांना वाटते. ही शताक्षीजींची सदिच्छा प्रत्यक्षात उतरो अशी आशा बाळगू या. कारण स्थानबद्धतेतून सुटल्यावर मेहबुबाजी आणि फारूख अब्दुल्लांनी जी मुक्ताफळे उधळली त्यावरून काश्मीरच्या भल्याची वाट बिकट असेल असेच दिसते.

**चौकट क्र.२**

**रद्द कलमां संदर्भात मतप्रदर्शने**

कलम ३७०च्या संदर्भात हरिहर कुंभोजकरांचा कायद्याच्या पलीकडले ३७०... हा लेख (लोकसत्ता २२ आक्टो.२०१९) योग्य दिशेने समतोल विचार मांडणारा होता. कुंभोजकर लिहितात, भारतीयांना काश्मीरला आपली वसाहत बनविण्याची इच्छा नाही. वसाहतवादी लोक वसाहतींवर पैसा खर्च करत नसतात; वसाहतींचे शोषण करतात. पण आज परिस्थितीत गुणात्मक बिघाड झाला आहे. आजचे काश्मीरचे नेते अतिरेक्यांच्या हातातील बाहुले बनले आहेत. काश्मिरींना स्वातंत्र्य हवे असे म्हटले जाते. काश्मिरांच्या स्वातंत्र्याची मागणी करणारे कोणत्या गोष्टीसाठी स्वातंत्र्य मागत आहेत?हा लेख वाचकांना महाजालावर वाचता यावा.

या निर्णयावर भाष्य करताना फैझान मुस्तपा आणि जगतेश्वर सोही यालेखक द्वयांनी एक गोष्ट स्पष्ट केली की कुठल्याही देशातील अल्पसंख्यांकांना देशांतर्गत राजकीय बाबींमधे स्वयंनिर्णयाचा अधिकार नसतो.मोदींनी देशाला संबोधित करताना आंतरराष्ट्रीय समुदाय डोळ्यापुढे ठवून काश्मिरींचे निवडणूक लढविण्याचे हक्क अबाधित राहतील हे नि:संदिग्ध शब्दात सांगितले होते(इं.ए. १४ ऑ. १९). याचे प्रत्यंतर केंद्र शासनाच्या अगदी नुकत्याच, २० ऑक्टो.च्या, राज्यात त्रिस्तरीय पंचायतीराज कायदा लागू करण्याच्या निर्णयात दिसले.या कायद्याअंतर्गत स्थानिक प्रशासनात निवडून आलेले प्रतिनिधी असल्याने नया काश्मीरमधे लोकशाही बळकट होईल असे मत इं.ए.च्या संपादकीयात व्यक्त केले (१९ आक्टो.).

**चौकट क्र. ३**

**आंतरराष्ट्रीय पडसाद**

संसदेने मंजूर केलेल्या अत्यंत महत्त्वाच्या निर्णयाचे आंतरराष्ट्रीय स्तरावर पडसाद उमटले. सर्वात प्रथम, भारताला साथ देणारा आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचा पूर्णवेळ सभासद रशिया लगेच भारताच्या पाठाशी उभा राहिला. रशियाने ३७०च्या निर्णयाला भारतीय संविधानाच्या अंतर्गत धरले. अमेरिका, इंग्लंड तटस्थ राहिले. चीनने विरोध दर्शविला. तो विषय आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न सफल झाला नाही (इं.ए. ११ ऑ २०१९). मालदीव आकाराने छोटासा पण स्वतंत्र मुस्लिम देश आहे. त्याने दिलेली, कलम ३७०चा निर्णय ही भारताची अंतर्गत बाब असून त्यावर इतरांनी दखल घेण्याची आवश्यकता नाही (ए.टा. २० जाने २०) ही प्रतिक्रिया पाकिस्तान, चीन या देशांना चपराक देणारी ठरली.पाकिस्तान देशातील सामूहिक मानसिक दौर्बल्याचे प्रदर्शन करत होता. मलेशियाचे पंतप्रधान मोहंमद महाथीरांनी निर्णयाविरोधात ऑक्टोबर २०१९च्या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेत मत प्रदर्शन केले. ते त्यांना महागात पडले. भारत मलेशियाचा पाम तेलाच मोठा ग्राहक असून भारतीय व्यापारी संघटनांनी मिळून आपली तेलाची मागणी दुसरीकडे वळविली. ते पाहून महाथीर यांच्या तोंडचे पाणी पळाले. त्यांनी सपशेल शरणागती पत्करली. त्यांनी स्वीकारले की, भारताच्या अंतर्गत बाबीतील ढवळाढवळ अनावश्यक होती (बिझी.

---

या विश्वाविषयक सर्वात अनाकलनीय गोष्ट ही आहे की, हे विश्व काही प्रमाणात का होईना पण आकलनीय आहे.

स्टॅंडर्ड २१ जाने २०). गेल्या वर्षभरात तुर्कस्तानचे अध्यक्ष रिसेप एरदोगन यांच्या आंतरराष्ट्रीय महत्त्वाकांक्षा मुखर होत आहेत. त्यांना सुन्नी जगतात आधुनिक खलिफापद मिळवायचे आहे. त्यामुळे पाकिस्तानला पाठिंबा देणे हा त्या धोरणाचा भाग होतो. एर्दोगननीही महाथीर यांच्या पाऊलावर पाऊल ठेऊन सं. रा. सभेत आणि इतर व्यासपिठांवर काश्मीर प्रश्नावर मत प्रदर्शन केले. सं.रा. परिषदेत जेंव्हा हा मुद्दा एर्दोगननी उपस्थित केला तेव्हा भारताचे कायम प्रतिनिधी टी. एस. त्रिमूर्तींनी लागोलाग ट्वीट करत त्याचा आणि पाकिस्तानसह ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक को-ऑपरेशनचा निषेध नोंदवला (म.टा. २४ सप्टें.२०२०). भारताच्या प्रतिनिधीने एर्दोगन बोलत असताना निषेध दर्शवत सभागृहातून त्याग केल्याचे आंतरराष्ट्रीय समुदायाने पाहिले.

**राजकीय घडामोडी**

गेल्या वर्षभरात काश्मीरमधे राजकीय घडामोडी घडत राहिल्या. कलम ३७० रद्दहोणे दहशतवाद्यांना आणि फुटिरतावाद पोसणाऱ्यांना पचविणे जड गेले. त्यांनी शहरांमधून व्यापारी आस्थापनांना धमक्या देत दुकानांवर भित्तीपत्रके चिटकवून व्यवसाय बंद पाडले. हे लक्षात येताच लागोलाग कारवाई झाली. श्रीनगरसह काश्मीर खोऱ्यात अनेक समाजकंटकांना स्थानबद्ध करण्यात आले (म. टा. २४ नोव्हें.). विधेयके रद्द होण्यावर आक्षेप घेणारी याचिका लगेच दि ९ ऑ.ला सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.

जम्मू-काश्मीर भारतात विलीन झाल्यापासून तुष्टिकरणाचा भाग म्हणून स्थानिक मुस्लिमांसह सर्व जनतेला धान्य आणि नित्योपयोगी वस्तू भारतातील किंमतींपेक्षा फार कमी भावात उपलब्ध करून दिल्या जातात. त्याचा आणि अनेक कल्याणकारी योजनांचा लाखो कोटींचा आर्थिक बोजा भारतीय जनता सोसत आली आहे. संसदेच्या निर्णयावर लिहिताना माजी नौदलप्रमुख अरुण प्रकाश यांनी एका निखालस वस्तुस्थितीवर प्रकाश टाकला. सात दशके केंद्रशासनाने आंधळेपणाने काश्मीरवर लाखो करोडोंच्या रकमा ओतल्या. त्यांचा विनियोग स्थानिकांचे रहाणीमान वाढण्यात न होता ९५ टक्के पैसा राजकारणी आणि त्यांच्याशी साटेलोटे राखणा-या नौकरशाहीने खिशात घातला. यापुढे केंद्रशासनासमोर दोन पर्याय आहेत. एकतर प्रतिबंध उठल्यावर काश्मिरातील लोकांना राष्ट्रीय प्रवाहात सामावून घेण्याचे धोरण आखणे किंवा दंडुकेशाहीने त्यांना आवरणे. प्रतिबंध काढल्यावर हिंसेच्या घटनांमधे वाढ होईल असे प्रकाश यांनी वर्तविले होते (इं.ए. १५ ऑ. २०१९). आताही दर दिवसाआड येणाऱ्या लष्कराच्या अतिरेकी विरोधी कारवायांच्या बातम्यांनी ते भाकित खरे ठरल्याचे दिसते.

स्थानबद्धतेचे दोन महिने संपण्यापूर्वीच अब्दुल्ला पितापुत्रांना नॅशनल कॉंग्रेसचे आणि मेहबूबा मुफ्तिंना पीडिपीचे कार्यकर्ते भेटून आले. जम्मूस्थित सज्जाद किचलू, जावेद राणा, रमण भल्ला, हर्षदेव सिंग, फिरदौस टाक इ. राजकीय नेत्यांची सुटका करण्यात येऊन त्यांना राजकारणात सक्रिय होण्याची परवानगी दिली गेली (इं.ए. ३ आक्टो.). पीडिपी, नॅशनल कॉंग्रेस आणि सोनिया कॉंग्रेस या घराणेशाहीला मार्च २० दरम्यान अपनी पार्टीचा पर्याय आला. मार्च २०च्या दरम्यान ओमर अब्दुल्ला मोकळे झाले.

काश्मिरातील महाजालावरील आणि संपर्कसाधनांवरील बंदी अजून उठलेली नाही. ती बंदी उठविण्यासाठी काश्मीर टाइम्सच्या संपादिका अनुराधा भसीन आणि गुलाम नबी आझाद यांनी याचिका दाखल केली.त्याला धरून न्यायालयाने बंधने काढण्याचा निकाल दिला पण नंतर केलेल्या एका याचिकेला धरून सर्वोच्च न्यायालयाने दि ११ मे २०२०च्या निकालाप्रमाणे,

---

दुसऱ्याला आपली गरज असते तेव्हा आपण 'बिझी आहोत' हे म्हणणं सोपं असतं; पण आपल्याला कुणाची गरज असते तेव्हा त्यानं 'बिझी आहे' असं उत्तर दिलं तर मात्र फार त्रास होतो.

सध्या केंद्रशासित असलेल्या जम्मू-काश्मीरमधे ४जी संपर्क व्यवस्था अंमलात आणण्याची मागणी फेटाळून लावली. सध्या काश्मीरमधे फक्त २जी सेवा उपलब्ध आहे. त्यामुळे फक्त दूरध्वनी संपर्कच शक्य असून देशात इतरत्र उपलब्ध असलेली दृकश्राव्य माध्यमे करोना काळात काश्मिरातील विद्यार्थ्यांना उपलब्ध नाहीत. त्यांचे नुकसान होते आहे. देशांतर्गत विमानसेवा तेथे सुरू केली आहे. त्यानेच शताक्षीजी नाशिकला पोहचू शकल्या.

कलम ३५अ निष्प्रभ झाल्याने गेली सात दशके मताधिकाराविना राहिलेल्या विशेषत हिंदू शरणार्थींना नागरिकत्व मिळू लागले. सध्या राज्यात १५ वर्षांपेक्षा अधिक काळ शासकीय सेवेत घालविलेल्या आणि उद्योगधंद्यासाठी राहिलेल्या आणि ७ वर्षे राहून १०वी-१२वीची परीक्षा स्थानिक बोर्डातून उत्तीर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना राज्याचे स्थायी निवासी असण्याचे प्रमाणपत्र अधिकृतपणे मिळते आहे.ही प्रमाणपत्रे वितरित करण्याचे अधिकार तहसिलदार कार्यालयांना आहेत. सुमारे ३३,००० स्थायी निवासी अर्जदारांपैकी २५,००० अर्जदारांना प्रमाणपत्रे वितरित झालीत. हे अर्जदार प्रामुख्याने जम्मूतील दोडा आणि काश्मिराच्या पुलवामा मधून आहेत. विशेष म्हणजे श्रीनगरमधून एकही प्रमाणपत्र वितरित झाले नव्हते अशी बातमी स्थानिक वृत्तपत्र दैनिक ट्रिब्यूनने दि २६ जूनला दिली. या प्रमाणपत्रांमुळे स्थानिक प्रशासनात नौकरी, स्थावर-जंगम मालमत्ता, शाळा-कॉलेज प्रवेश बाबतीत नवेस्थायी निवासी काश्मीरींच्या बरोबरीत येतील.

**चौकट क्र. ४**

**प्रमाणपत्र विरोधात गदारोळ**

गैर-काश्मिरी अधिकारी नवीन चौधरी यांना स्थायी निवासी प्रमाणपत्र मिळताच एकच गदारोळ उठला. हे गैर-काश्मिरी स्थानिक लोकसंख्या समतोल (Demography) बदलतील आणि काश्मिरींच्या मूलभूत हक्कांवर गदा येईल अशी हाकाटी सुरू झाली. ओमर अब्दुल्लांनी ट्वीट करत वादाला तोंड फोडले.

**Omar's tweet**

All our misgivings about the new domicile rules in JK are coming to the fore. We in @JKNC_opposed the changes because we could see the nefarious design behind the changes. The people of JK on both sides of the Pir Panjal mountains will be the sufferers of these domicile rules.

काश्मीरव्यतिरिक्त भारतात त्याची दखलही कुणी घेतली नाही. पण अल जझीरा या वाहिनीने ठळकपणे दि २८ जूनच्या वार्तापत्रात ओमरच्या ट्वीटची नोंद घेतली. अमेरिकेच्या डेमॉक्रटिक पक्षाचे अध्यक्षीय उमेदवार जो बिडेन यांच्या वक्तव्याला जोरदार प्रसिद्धी दिली.

Democratic presidential hopeful Joe Biden said, India should take all necessary steps to restore the rights of all the people of Kashmir.

Restrictions on dissent, such as peaceful protests or shutting or slowing down the internet weaken democracy, says a policy paper posted on hiswebsite.

**Kashmir becoming another Palestine**

The decision to provide non-Kashmiri residents with a domicile certificate is certainly the beginning of the end. This is the beginning of Kashmir becoming another Palestine,Badar-Ul-Islam Sheikh, a29-year-old resident of the main city of Srinagar, told Al Jazeera.

भारताच्या अंतर्गत बाबींमधे नाक खुपसण्याचा या प्रकाराकडे सर्वांनी दुर्लक्ष केले. बिचारा बदर-उल-इस्लाम! त्याला कळत नाही की पॅलेस्टाईनींच्या दशकानुदशके चाललेल्या अंतर्गत दूरवस्थेला कंटाळून आता अरब देशांनी त्याला वाळीत टाकून इस्रायलशी जवळिक साधली आहे.

**सद्य परिस्थिती**

पाकिस्तानकडून येणारा पैसा सामान्य तरुणांना रोजंदारीवर दगडफेक करण्यासाठी देऊन त्यांना लष्कराच्या तोंडी देणा-या नेत्यांनी स्वत:ची मुले परदेशी शिकण्यासाठी पाठविली अथवा त्यांना सरकारी नोकरीत मोठ्या पदांवर नेमले गेले. त्याचा जनतेत राग आहे. या दुर्दैवी मुलांना शाळेत जाताच येऊ नये म्हणून शाळा आणि वाचनालये जाळून टाकण्यासाठी त्यांना चिथावणी दिली जात होती. यावर प्रकाश टाकताना अमित शहांनी काही नेत्यांची नावे देत त्यांच्या मुलांचे परदेशांतील शिक्षण आणि लाखांत मिळणारे लठ्ठ पगार यांची माहिती लोकसभेत मांडली. त्यांनी आवाहन केले की, सामान्य परिस्थितीतील तरुणांनी ते लक्षात घेऊन पाकिस्तानच्या तालावर नाचणा-या या नेत्यांच्या नादी लागू नये. त्यांनी आशा व्यक्त केली की आम्हाला काश्मीरमधे केवळ शांतताच आणायची नाही तर आम्ही ज्या दिवशी काश्मिरी पंडित आणि सूफी मुस्लिम एकत्र येऊन क्षीरभवानी मंदिरात एकत्र प्रार्थना करतील त्या दिवसाची वाट पाहतो आहोत (दि हिंदू २ जुलै १९).

आजच्या घटकेला काश्मीरमधे अशांतता आहे. काही मोजक्या नेत्यांकडे येणारा अवैध पैशाचा ओघ ब-याच प्रमाणात आटल्याने तरुणांनी रस्त्यांवर उतरून दगडफेक करण्याचे जवळपास थांबले आहे. मेहबुबा, अब्दुल्ला पितापुत्र,आणि इतर नेते स्थानबद्धतेतून मुक्त झालेत. त्यांनी एकत्र येऊन गेल्या वर्षी जो आक्रस्ताळेपणाचा गुपकर मसुदा मांडला होता तोच राग आताही आळवला. फारूख महाशयांनी ३७० कलम पुन्हा आणण्यास चीनची मदत मिळण्याची वेडी आशा व्यक्त केली. फक्त काश्मिरी राज्यध्वज समोर ठेवून तिरंग्याला खांद्यावर घेणारा कोणी मिळणार नाही ही दर्पोक्ती मेहबुबांनी परत आळवली. मेहबुबांच्या या वक्तव्यावर आक्षेप नोंदवत पीडिपी सांसद टी. एस. बाजवा, भूतपूर्व सचिव वेद महाजन आणि हुसैन ए. वफ्फा या तीन मोठ्या नेत्यांनी राजीनामा दिला. त्यांच्या जाण्यामुळे पीडिपीला खिंडार पडले.

पहिले दोन महिने संचारबंदी कडकपणे अंमलात आणली गेली. ती वेळ सफरचंदे काढण्याची होती. ते काम वेळेत होऊ न शकल्याने शेतक-यांचे अतोनात नुकसान झाले. हळूहळू प्रशासन काम करू लागले आहे. जम्मू लड्डाख भागात ते अधिक सक्रिय आहे. असेही झाले की मार्च २० पर्यंत जे ६-७ महिने मिळाले त्या दरम्यान केंद्रशासनाला स्थानिक नौकरशाहीकडून कार्यक्षमतेने काम करवून घेता आले नाही.त्यामुळे अपेक्षित बदल दिसून आला नाही. काही अंशी व्यापार सुरू होण्याची तयारी सुरू असतानाच करोनाच्या संकटाचे परिणाम काश्मिरातही झाले आहेत. सध्या करोनापासून मुक्ती मिळविणे आणि होतोहोईतो तो पसरण्यावर आळा घालणे यातच केंद्र आणि राज्य सरकारे गळ्यापर्यंत बुडाली आहेत. जम्मू-काश्मीरच नव्हे तर पूर्ण जग एक प्रकारे ठप्प झाले आहे. जोवर करोनापासून मुक्ती मिळण्याचे साधन हाती येत नाही तोवर जम्मू-काश्मीरमधे स्थिती जैसे थे अशीच राहिल.

पर्यटन, हस्तकला, उद्योग क्षेत्रात तात्काळ रोजगार निर्मितीसाठी १३५० कोटी केंद्राने दिले आहेत. लोकांना वीज आणि पाणी बिलात ५० टक्के सवलत, हँडलूम आणि हस्तकला क्षेत्रातील आर्थिक उचल दोन लाखांपर्यंत वाढविणे, मालवाहतूक करणारे, रिक्षाचालक, हाऊसबोट मालक, अशा लहान रोजगारांना थेट आर्थिक मदत देण्याची योजना आर्थिक मदत उपलब्ध करण्यामागे आहे. दरम्यान धिम्यानौकरशाहीला वठणीवर आणून वरील योजना चांगल्या कार्यक्षमतेने राबवल्या, मशिदींमधून चालणारे काफिरव्देषाचे (Kafirophibia) प्रचार तंत्र काबूत आणले आणिप्रस्थापित घराणेशाही

(पृष्ठ क्र. २२ वर)

पाण्यापेक्षा तहान किती आहे याला जास्त किंमत असते. मृत्यूपेक्षा श्वासाला जास्त किंमत असते.

# अंतराळ शास्त्रज्ञ डॉ. कल्पना चावला

*अंतराळ शास्त्रज्ञ डॉ. कल्पना चावला यांच्या कार्याचा काढावा या लेखात घेण्यात आला आहे - संपादक*



(जन्म : १७ मार्च १९६२, मृत्यू : १ फेब्रुवारी २००३) तिचे कोलंबिया अवकाशयान दुर्घटनेत, वयाच्या अवघ्या चाळिसाव्या वर्षीच अपघाती निधन झाले.

स्वप्नांतून यशांत उतरण्याचा मार्ग अस्तित्वात असतो. तुम्हाला तो दिसावा अशी दृष्टी लाभो, त्यावर मार्ग क्रमण्याचे साहस लाभो आणि त्याचा पाठपुरावा करण्याचे सातत्यही लाभो. - डॉ. कल्पना चावला १.

कल्पना चावला जाऊनही आता सुमारे दोन दशके होत आली, तरी आजही जगभरातील असंख्य युवा-युवतींची ती प्रेरणास्रोत बनून राहिलेली आहे. विशेषतः तरुण महिलांची. तिचा जन्म हरियाणा राज्यातील कर्नाल येथे १७ मार्च १९६२ रोजी एका गरीब कुटुंबात झाला. तिचे वडील बनारसीलाल चावला हे पाकिस्तानातून फाळणीपश्चात भारतात यावे लागलेले हिंदू निर्वासित होते. आईचे नाव संयोगिता होते. उन्हाळ्याच्या दिवसांत ते सर्वचजण घराच्या छतावर झोपत असत. कल्पना आकाशातले तारे पाही. तिला ताऱ्यांत जाऊन त्यांना हात लावावा वाटे. लहान असल्यापासूनच तिला अवकाशवेधाची स्पप्ने पडत असत. टागोर बाल निकेतन शाळेतून तिचे शालेय शिक्षण झाले.

भारतातील 'फ्लाईंग क्लब' असलेल्या मोजक्या ठिकाणांतील एक गाव होते 'कर्नाल'. तिथल्या 'फ्लाईंग क्लब' पासून काही किलोमीटर अंतरावरच तिचे घर होते. तिचा भाऊ संजय तिथे विमानन प्रशिक्षणासाठी जात असे, तिला मात्र मुलगी असल्यामुळे वडिलांनी अशा प्रशिक्षणाची परवानगी दिली नाही. तिला छतावर जाऊन ती विमाने पाहत राहण्याचा छंदच जडला. शाळेत असताना ती विमानांची चित्रे काढी, तर महाविद्यालयात असताना अभिकल्पन तंत्रज्ञानाच्या वर्गात विमानांचे नमुनेच तयार करत असे. दहावीत असतानाच तिचा निश्चय झालेला होता की, आपण विमान उडवायचे. मंगळावर 'व्हायकिंग' अवतरक उतरल्याचे फोटो पाहून तर तिला अवकाश भ्रमणाचे वेध लागले.

आकाशातील ताऱ्यांत पोहोचण्याचे तिचे स्वप्न होते. पंजाब इंजिनिअरिंग कॉलेज, चंदिगढ येथून ती १९८२ साली, विमानन अभियांत्रिकीत (एरोनॉटिकल इंजिनिअरिंगमध्ये) बी.टेक झाली. मात्र तिथे प्रवेश मिळालेल्या सात मुलींपैकी फक्त कल्पनानेच विमानन अभियांत्रिकीत प्रवेश घेतलेला होता. असा विषय मुलींनी घेऊ नये अशीच तत्कालीन समाजाची धारणा होती. कल्पनाचा मात्र त्या विषयी जणू हट्टाग्रहच होता.


भारतातून त्याकाळी प्रत्यक्ष अवकाशात झेप घेणे शक्यच नव्हते. हे लक्षात आल्यावर, हर प्रयासे अमेरिकेत जाऊन, आपल्या उपजत बुद्धिमत्तेच्या आणि उत्साही स्वभावाच्या बळावर जगातील अत्यंत प्रगत देशात जाऊन, अत्यंत आधुनिकतम विषयात, अंतराळशास्त्रात तिने शास्त्रज्ञ म्हणून नाव कमावले. १९८३ साली व्यवसायाने विमानोड्डाण प्रशिक्षक आणि यानांच्या विजकीय प्रणालींचे लेखक असलेल्या जीन-पिअरे हॅरिसन यांचेशी तिचे लग्न झाले. तिचे आकाशातील ताऱ्यांत जाण्याचे स्वप्नही सत्यात उतरले. त्याचीच ही स्फूर्तीप्रद कहाणी आहे २.

१९८४ साली टेक्सास विद्यापीठ, अर्लिंग्टन, अमेरिका येथून अवकाश अभियांत्रिकीत ती एम.एस. झाली. १९८६ मध्ये तिने दुसरी एम.एस. पदवीही प्राप्त केली. मग कोलोरॅडो विद्यापीठ, बोल्डर, अमेरिका येथून अवकाश अभियांत्रिकीत पी.एच.डी. होऊन तिने १९८८ साली डॉक्टरेट मिळवली ३. तिच्या शोधनिबंधाचा विषय होता, 'अस्थिर आवर्ती प्रवाहांच्या चालिकीचे संगणन आणि नियंत्रण' (कॉम्प्युटेशन ऑफ डायनामिक्स अँड कंट्रोल ऑफ अनस्टेडी व्होर्टिकल फ्लोज).

'तिच्यापुढे कुणी आदर्श नव्हता. इंदिरेची ईर्ष्या, जे.आर.डीं.ची जिद्द, किरण बेदींचा कर्मवाद, एक एक प्रकाशकण वेचून तिनेच त्याचा ध्रुवतारा बनवला आणि त्याकडे पाहत ती पावले टाकत राहिली. एक नवी वाट निर्माण केली. मागच्यांसाठी आदर्श ठेवला. उल्केप्रमाणे ती क्षणार्धात अंतर्धान पावली. राख शरीराची होते. विचारांची, आदर्शांची राख करणारा अग्नी अजून जन्मलेलाच नाही. तिने असंख्यांच्या मनात प्रकाशाचे कण पेरले. ते रुजतील, फुलतील आणि त्या तारकापुंजातून तिचेच तेज फाकेल. तिने प्रत्यक्षात आणलेला संदेश अमर आहे. स्वप्नाकडून सत्याकडे जाणारी वाट खरोखरोखरीच अस्तित्वात आहे.' - माधुरी शानभाग ४.

कल्पनाला विमानोड्डाण, पदभ्रमण, पदयात्रा आणि वाचनाची आवड होती. तिच्यापाशी एकल आणि बहुयांत्रिक, भूपृष्ठ आणि सागरी विमाने, वायूतरंगे (ग्लाईडर्स) विमानोड्डाण प्रशिक्षक असल्याबाबतची अनुज्ञा होती. त्यात विमानांकरतानाचा उपकरण दर्जाही समाविष्ट होता. हवाई कसरतींत आणि पुच्छचक्री (टेल-व्हिल) विमानांत तिला रस होता. अंतिमतः नासामध्ये रुजू होण्याचे तिचे स्वप्न साकार झाले.

## अनुभव



१९८८ मध्ये कल्पनाने नासाच्या अमेस संशोधनकेंद्रात सशक्त-उचल संगणित द्रवचालिकी (पॉवर्ड लिफ्ट कॉम्प्युटेशनल फ्लूयुईड डायनॅमिक्स) विषयात कार्य सुरू केले. तिचे संशोधन, हॅरिअर सारख्या विमानांभोवती 'भू-प्रभावा'खाली अनुभवास येणाऱ्या जटिल वायूप्रवाहाच्या अनुकारांवर केंद्रित होते. हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर, तिने समांतर संगणकांवर प्रवाह-उकलक (फ्लो-सॉल्व्हर्स) नकाशांकित करणाऱ्या संशोधनास साहाय्य केले. सशक्त-उचल गणनाच्या आधारे प्रवाह-उकलकांच्या चाचण्या करण्याचे कार्य केले. १९९३

जगाला काय आवडतं ते करू नका, तुम्हाला जे आवडतं ते करा; कदाचित उद्या, तुमचं आवडतं जगाची आवड बनेल. .!!!

मध्ये, इतर हलत्या बहु-वस्तू समस्येच्या अनुकार विशेषज्ञ संशोधकांच्या सोबतीने, 'ओव्हरसेट मेथडस इन्कॉर्पोरेटेड' या एका संशोधक संस्थेच्या स्थापनेत, कल्पना उपाध्यक्ष आणि संशोधक शास्त्रज्ञ म्हणून सहभागी झाली होती. विमानचालिकीय इष्टतमीकरण (एरोडायनॅमिक ऑप्टिमायझेशन) साध्य करण्याकरता प्रभावी तंत्रे विकसित करण्याची आणि ती सिद्ध करण्याची जबाबदारी तिच्यावर होती. कल्पना ज्या ज्या प्रकल्पांत सहभागी होती त्या प्रकल्पांचे निष्कर्ष परिषदांतून आणि नियतकालिकांतून वाचलेल्या शोधनिबंधांद्वारे व्यवस्थित दस्तबद्ध (डॉक्युमेंटेड) केलेले आहेत.

कल्पनाने १९९१ साली अमेरिकेचे नागरिकत्व पत्करले. मग तिने 'नासा ॲस्ट्रॉनॉट कॉर्प्स' मध्ये दाखल होण्याकरता अर्ज केला. मार्च १९९५ मध्ये ती त्यात रुजू झाली आणि १९९६ साली पहिल्या उड्डाणाकरता तिची निवडही झाली.

### नासामधील अनुभव

डिसेंबर १९९४ मध्ये नासाने कल्पनाची नियुक्तीकरता निवड केली. मार्च १९९५ मध्ये कल्पना, जॉन्सन स्पेस सेंटरमध्ये उमेदवार अंतरीक्षवीर म्हणून, अंतरिक्षवीरांच्या १५ व्या तुकडीत रुजू झाली. एक वर्षाचे प्रशिक्षण आणि मूल्यांकन पूर्ण झाल्यावर कल्पना, अंतरीक्षवीर कार्यालय, वाहनबाह्य कार्यवाही (एक्स्ट्रा वेहिक्युलर ॲक्टिव्हिटी-ई.व्ही.ए.) आणि तत्संबंधी संगणक शाखांच्या तांत्रिक बाबींवर काम करण्यासाठी पथक-प्रतिनिधी (क्रू-रिप्रेझेंटेटिव्ह) म्हणून नियुक्त झाली. त्यानंतर यंत्रमानवी परिस्थिती जागरूकता दर्शक (रोबोटिक सिचुएशनल अवेअरनेस डिस्प्लेज) आणि अवकाशयान नियंत्रक कार्यप्रणाली चाचणी (स्पेसशटल कंट्रोल सॉफ्टवेअर टेस्टिंग) यांच्या विकसनाचे काम करण्याकरता मग तिची नियुक्ती, यानाच्या वीजकीय प्रणालीच्या समाकलन प्रयोगशाळेत (शटल एव्हिऑनिक्स इंटिग्रेशन लॅबोरेटरीमध्ये) करण्यात आली. नोव्हेंबर १९९६ मध्ये एस.टी.एस.-८७ मोहिमेकरताची मोहिम विशेषज्ञ आणि प्रमुख यंत्रमानव हस्तचालक (मिशन स्पेशॅलिस्ट अँड प्राईम रोबोटिक आर्म ऑपरेटर) म्हणून नेमण्यात आले. जानेवारी १९९८ मध्ये यान आणि स्थानक उड्डाण-पथक उपस्कराकरता पथक प्रतिनिधी (शटल अँड स्टेशन फ्लाईट क्रू इक्विपमेंट, क्रू रिप्रेझेंटेटिव्ह) म्हणून तिची नियुक्ती झाली. त्यानंतर तिने अंतरीक्षवीर कार्यालय पथक-प्रणाली आणि निवासयोग्यता अनुभागाचे नेतृत्व केले (लीड फॉर द ॲस्ट्रॉनॉट ऑफिसेस क्रू सिस्टिम्स अँड हॅबिटेबिलिटी सेक्शन). १९९७ मध्ये एस.टी.एस.-८७ मोहिमेसोबत आणि २००३ मध्ये एस.टी.एस.-१०७ मोहिमेसोबतही तिने अवकाश उड्डाण केले. एकूण ३० दिवस, १४ तास आणि ५४ मिनिटे ती अंतरिक्षात राहिली.

### अवकाशयानाचा अनुभव

१९ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर १९९७ दरम्यान एस.टी.एस.-८७ या 'कोलंबिया' मोहिमेचा पूर्ण अनुभव. हे अमेरिकेचे चौथे सूक्ष्मगुरूत्व कार्यकारी-भार उड्डाण (मायक्रोग्रॅव्हिटी पे-लोड फ्लाईट) होते. अंतरिक्षातील वजनहीन परिसराचा निरनिराळ्या भौतिक प्रक्रियांवर आणि सूर्याच्या बाह्य वातावरण थरांच्या निरीक्षणांवर कसा प्रभाव पडतो त्याचा अभ्यास करण्यासाठी अभिकल्पित प्रयोगांवर ते केंद्रित होते (फोकस्ड ऑन द एक्सपेरिमेंटस डिझाईन्ड टू स्टडी हाऊ द वेटलेसनेस एन्व्हिरॉनमेंट ऑफ स्पेस अफेक्टस व्हेरियस फिजिकल प्रोसेसेस अँड ऑन ऑब्झर्व्हेशन्स ऑफ द सन्स आऊटर ॲटमोस्फिहरिक लेअर्स). पथकातील दोन सदस्यांनी वाहनबाह्य कार्यवाहीही (अंतरिक्षचाल) केली. यात मानवी कृतीने 'स्पार्टन ५' उपग्रह पकडण्याचाही समावेश होता. भावी अवकाश स्थानक जुळणीकरताच्या

कोणतीही व्यक्ती चांगली किंवा वाईट नसते. फरक इतकाच असतो की,
ती व्यक्ती आपल्या मनाप्रमाणे वागत नाही.

वाहनबाह्य कार्यवाहीपात्र अवजारांची आणि पद्धतींची चाचणीही यावेळी करण्यात आली. एस.टी.एस.-८७ मोहिमेतील यानाने २५२ पृथ्वीप्रदक्षिणा ३७६ तास आणि ३४ मिनिटांत पूर्ण केल्या. याकरता त्याने एकूण ६५ लाख मैल अंतराचा प्रवास केला.

१६ जानेवारी ते १ फेब्रुवारी २००३ दरम्यानचे एस.टी.एस.-१०७ 'कोलंबिया' उड्डाण, विज्ञान आणि संशोधन मोहिमेस वाहिलेले होते. आळीपाळीने दिवसाचे २४ तास काम करून पथकाने यशस्वीरीत्या सुमारे ८० प्रयोग पूर्ण केले. १ फेब्रुवारी २००३ रोजी पृथ्वीवर उतरण्याच्या विहित वेळेच्या आधी १६ मिनिटे, अवकाशयान 'कोलंबिया' त्याच्या पथकासहित नष्ट झाले आणि मोहीम अवचितच संपुष्टात आली.

**पारितोषिके**

मरणोत्तर काँग्रेशनल स्पेस मेडल ऑफ ऑनर, नासा स्पेस फ्लाईट मेडल आणि नासा डिस्टिंग्विश्ड सर्व्हिस मेडल.

कल्पनाच्या मृत्यूपश्चात २००३ साली, भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांनी अशी घोषणा केली की, 'मेटसॅट' ही जी भारतीय हवामानशास्त्रीय उपग्रहांची मालिका आहे, ती यापुढे 'कल्पना' या नावाने ओळखली जाईल. त्यानुसार १२ सप्टेंबर २००२ रोजी प्रक्षेपित केलेल्या 'मेटसॅट-१' या भारतीय उपग्रहाचे नाव 'कल्पना-१' असे ठेवण्यात आले. २००४ साली कर्नाटक सरकारने तरुण महिला शास्त्रज्ञांना मान्यता देण्याकरता 'कल्पना चावला' पारितोषिक देणे सुरू केले. नासाने आपल्या एक महासंगणकाचे नावच 'कल्पना चावला' ठेवले. कल्पनाच्या स्मरणार्थ सुरू केलेल्या पारितोषिकांची, तिचे नाव दिलेल्या स्मारकांची सूची आजही मारुतीच्या शेपटाप्रमाणे वाढतच आहे. अर्लिंग्टन, अमेरिका येथील विद्यापीठाच्या एका हॉलचे नावही 'कल्पना चावला हॉल' असे ठेवण्यात आले आहे.

उण्यापुऱ्या चाळीस वर्षांच्या तिच्या पृथ्वीवरील वास्तव्यात कल्पनाने उत्तुंग आकांक्षा कशा बाळगाव्यात, त्यांचा पाठपुरावा कसा करावा आणि मनोरथांना सत्यात कसे उतरवावे याचा आदर्श वस्तुपाठच घालून दिला आहे. कल्पना भारतीय आहे याचा आपल्याला अभिमान तर वाटलाच पाहिजे. ती मात्र भारतापुरती सीमित राहिली नाही. ती विश्वयात्री झालेली आहे.

**कल्पना**

शार्दूलविक्रीडित (अक्षरे-१९, यती-१२,७)
होती पाहत ती छतावरुनिया, रात्रींत तारे तयां
वाटे लावु बघून हात इतकी, साधी असे 'कल्पना' ।
भाऊ संजय तो उडू शकतसे, छोट्या विमानांतुनी
होता काळ न तो असा की तिजला, देउ शके संधि ती
।। १ ।।

चित्रे काढत, स्वप्न रंगवित ती, आकाशी जाई जरी
कर्तृत्वे झळकून, मार्ग मिळता, नासात गेली खरी ।
उड्डाणे शिकली, विमानन पुरे, सारे तिने साधले
झाली डॉक्टर ती, खुशाल अवकाशा लक्षू ती लागली
।। २ ।।

केले पूर्ण प्रशिक्षणास सगळ्या, लोकांसही भावली
चित्ताने स्थिर राहिली, चपळ ती, यानांत आनंदली ।
आकाशी उडली, खरेच अवकाशातून संचारली
लोकांना परि 'कल्पना' न मिळता, आकाशि सामावली
।। ३ ।।

**संदर्भः**

१ डॉ. कल्पना चावला, लेखिका पृथ्वी मेहता https://poc2.co.uk/2019/01/08/dr-kalpana-chawla-astronaut/ २५ जानेवारी २००३ रोजी 'कोलंबिया' अवकाश यानातून कल्पनाने आपले

प्राध्यापक, पंजाब अभियांत्रिकी महाविद्यालयातील वैमानिकी विभागाचे निवृत्त प्रमुख, डॉ. व्ही. एस. मल्होत्रा यांना पाठवलेल्या संदेशातील हे एक वाक्य आहे.

२ रिमेबरिंग कल्पना चावला, द फर्स्ट इंडियन वूमन इन स्पेस. https://www.femina.in/celebs/international/life-and-journey-of-kalpana-chawla-36584.html

३ अमेरिकन राष्ट्रीय वैमानिकी आणि अवकाश प्रशासन (नॅशनल एरॉनॉटिक्स अँड स्पेस ॲडमिनिस्ट्रेशन, नासा), मे-२००४. https://www.nasa.gov/sites/default/files/atoms/files/chawlaškalpana.pdf

४ स्वप्नाकडून सत्याकडेः कल्पना चावलाची कहाणी, माधुरी शानभाग, मेहता पब्लिशिंग हाऊस, मार्च २००३, किंमत रु.८०/-

५ खगोलशास्त्राकरताचे, यान-बिंदू स्वायत्त संशोधन अवजार (एस.पी.ए.आर.टी.ए.- शटल पॉईंट ऑटोनॉमस रिसर्च टूल फॉर ॲस्ट्रॉनॉमी). हा एक अंतरीक्षात वावरणारा मुक्त उपग्रहच असतो.

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

(पृष्ठ क्र. १७ वरून – **कलम ३७० आणि ३५अचे वर्षश्राद्ध**)

नेत्यांनी सामान्य तरुणांचा कसा भ्रमनिरास केला हे जर स्थानिक तरुणांना पटवून देता आले तर भविष्यात का'मीरला सध्याच्या दुरवस्थेतून बाहेर काढण्याचा मार्ग शोधता येईल.

**– डॉ. प्रमोद पाठक**
८, वसुंधरा सहनिवास,
आयचित नगर,
नाशिक - ४२२०१३
drpvathakyahoo.co.in

लेखक परिचय – डॉ. प्रमोद पाठक, व्यवसायाने रसायनतंत्रज्ञ (M. Tech. (Chemical Engg.) I. I. T. Mumbai, Ph. D. (Indology) आहेत. त्यांची वैदिक आणि सिंधू संस्कृतीवर पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांनी संशोधनपर आणि वृत्तपत्रांतून विपुल वैचारिक लेखन केले आहे. गेली काही वर्षे ते इस्लाम, संस्कृती आणि समाज यावर लेखन करीत असून त्यांची दोन पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

•••

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

# गडचिरोली जिल्ह्यातील दोन त्रिवेणी संगम

*विदर्भाच्या निसर्गाला नेहमीच पाणीदार अस्तित्व असते. त्या पाणीदार अस्तित्वाचे वर्णन लेखकाने भामरागड आणि सिरोंचा येथील त्रिवेणी संगमाद्वारे मांडण्याचा स्तुत्य प्रयत्न केलेला आहे.- संपादक*



भामरागड



सिरोंचा

माझे मोठे बंधू सत्तरच्या दशकात वनविभागात सध्याच्या गडचिरोली जिल्ह्यातील भामरागड आणि सिरोंचा येथे कार्यरत होते. त्यांच्याकडून तिथले त्रिवेणी संगम, निसर्ग, माडिया गोंड या जमातीचे खाणे-पिणे, घरे, कपडेलत्ते, नृत्य, जिवनशैली आदिंची रसभरीत वर्णने नेहमीच ऐकून असायचो. त्यामुळे या स्थळांना भेट देण्याची उत्कंठा नेहमीच लागलेली असायची.

शेवटी २५ ऑक्टोबर २०१९ या दिवशी हा योग जुळून आला. मित्राच्या ओळखीने भामरागड येथील वन विभागाच्या रेस्ट हाऊसचे आरक्षण आधीच केलेले असल्याने चिंता नव्हतीच. ऑक्टोबर हा अशा भटकंतीसाठी अती उत्तम. हा मास हिरवा असतो आणि त्याला असते पाणीदार अस्तित्व. हे दिवस फुलायचे आणि फुलांचे असतात. मराठीत त्यावेळी अश्विन मास सुरू असतो. अश्विनचे येणे असे पावसाच्या जाण्यासोबतच असते. तसा निरोपाचा क्षण प्रत्येकाच्या वाट्याला येतो. पण पाण्यासारखे अलवार निघून जाणे कुणालाच जमत नाही. नद्यांच्या खाणाखुणा तो मागे ठेवून जातो. परतणाऱ्या पावसाला आडवे झाले तरी पाऊस मग वळूनही बघत नाही.

असो; पहाटे ५ वाजता बल्लारपूरहून सफारीस सुरवात झाली. सोबतीला होती माझी पत्नी आणि ड्रायव्हर. मात्र सर्वदूर धुक्याचेच साम्राज्य. १०० कि. मी. अंतरावरील आलापल्लीस पोहचेपर्यंत आम्ही त्याच्याच कब्जात. कारचे लाईट सतत सुरू ठेवूनच हळूवार प्रवास करावा लागला. मी मात्र मनोमन निसर्गास धन्यवाद देत होतो. दाट धुक्यामुळे आम्हास भूल पडली. ही भूल मन प्रसन्न करणारी आणि निसर्गाला जवळ

करण्याची प्रेरणा देणारी असते हे त्या दिवशी उमगले. वाटेत आष्टी नजीक वैनगंगेला ओलांडले. मात्र धुक्यामुळे तिचे पुलाखालील वैभव बघता आले नाही.

आलापल्लीस सकाळी ०९ च्या दरम्यान पोहोचलो. तिथे चहानास्ता घेऊन दुपारी १२ च्या सुमारास सिरोंचास पोहोचलो. हे स्थान इंग्रजी अमदानीत वेस्ट गोदावरी म्हणून सी. पी. ॲन्ड बेरार राज्याचे जिल्ह्याचे ठिकाण होते. अजूनही इथले ब्रिटशकालीन बंगले सुव्यवस्थित आहेत. इथे प्राणहिता नदी गावाला लागूनच वाहती आहे. वर्धा आणि वैणगंगा नदीचे प्रवाह आष्टीच्या थोडे पुढे चौडमपल्ली गावाजवळ एकमेकांना मिळतात आणि त्यानंतर तयार होणाऱ्या प्रवाहाला 'प्राणहिता' म्हणतात. दिग्दर्शक राजमौलीच्या बाहुबली सिनेमात या नदीचा उल्लेख येतो. ही नदी सुमारे १२५ कि.मी. प्रवाहीत होत सिरोंच्याच्या पुढे सुमारे ५ कि. मी. अंतरावर तेलंगांना राज्याच्या कालेश्वर मुक्कामी गोदावरी नदीस मिळते. दोन्ही नद्यांचा जलौध अवाढव्य आणि पात्रही सुमारे ३ कि.मी. रूंदीचे. सद्या कालेश्वरास जाण्यास सिरोंचावरून उत्तम पुल आहे. मात्र पुल नसताना शीड असलेल्या मोठ्या नावांचाच उपयोग करावा लागायचा. कालेश्वरास पाण्याचा प्रवाह वेगवान असून खोलीही भरपूर आहे. त्यामुळे नदीकाठी जाण्यास मनाई आहे. पाण्यात पाय ठेवताच पायाखालची वाळू सरकत असल्याचे जाणवते. त्यामुळे आपण लागलीच तोल जाऊन पडू शकतो.

संगम झाल्याबरोबर ह्या प्रवाहास नजीकच ओडिसा, छत्तीसगढ, महाराष्ट्र आणि तेलंगाना ह्या राज्यांच्या सिमेवरून वाहत येणारी इंद्रावती नदी आडवी येते. हा त्रिवेणी संगम अलाहाबाद (प्रयागराज) च्या संगमापेक्षाही मोठा आहे. इथे निळेशार पाणी, आकाश व क्षितिज एकत्र आलेले दिसतात. सर्वदूर निळाईचीच माया. पलीकडली दुनिया निळ्या धुक्यात अदृश्य होत असल्याचे जाणवते. गोदावरीचा पुढचा प्रवास घनदाट अरण्यातून होत असल्याने तिचे अदृश्यमान होणे आंध्रप्रदेशातील राजमुंद्री गावाजवळ समुद्रास मिळेस्तोवर सुरूच असते.

सध्या नव्यानेच तयार झालेल्या पुलावरून पलीकडील तेलंगाना राज्यातील कालेश्वरला पोहोचलो. मंदिर दक्षिणात्य पद्धतीचे असून सभोवती उंच गोपुरे आहेत. सर्वत्र  नक्षीकाम व देवदेवतांच्या मूर्त्यां बाह्य भिंतीवर कोरलेल्या आहेत. परिसर अवाढव्य आहे. इथे शंकराच्या पिंडीवर अखंड अभिषेक सुरू असतो. मंदिर परिसरातच राम, लक्ष्मण, सिता व हनुमानाची मंदिरे सुद्धा आहेत. या सर्वांचा श्रद्धेने पूजाविधी आटोपून परत जाण्यास  निघालो.

परततांना प्रभुरामचंद्रानी स्वहस्ते वाळूपासून तयार केलेले शिवलिंग इंद्रावतीच्या पलीकडील बस्तर जिल्ह्यातील (छत्तीसगढ) एका गुफेस स्थापित असल्याचे समजले. या गुफेच्या नजीकच प्राचीन मंदिर असून या मंदिराच्या स्थापत्य शैलीनुसार कंबोडियातील प्रसिद्ध अंकोरवाटच्या मंदिराची रचना करण्यात आल्याचेही समजले. फरक एवढाच की या मंदिरापर्यंत जाणारा मार्ग बिकट असून काही लोकांनाच त्याची माहिती आहे. त्यातल्या त्यात नक्षलवाद्यांचा हा बालेकिल्ला असल्याने इथपर्यंत जाणे सद्यातरी दुरापास्तच.

येताना प्राणहितेचा प्राचीन प्रवाह असलेली जागा दिसली. नजीकच डायनासोरचे जिवाश्म सुद्धा बघायला मिळतात. त्यामुळे भूगर्भशास्त्र व इतरही शास्त्राच्या विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी तरी महाराष्ट्राच्या या सुदूर पूर्वेकडील भागास नक्कीच भेट द्यावी.

कालेश्वरवरून परतताना रेवनपल्ली येथे झोपडी वजा ढाब्यावर शाकाहारी भोजन घेतले. विचारपूस करताना जाणवले की, नक्षलाच्या दहशतीत वावरताना सुद्धा इथले नागरिक स्वाभीमानी असून प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहेत. घनदाट अरण्यात असणाऱ्या

---

सगळे वार परतवता येतात पण अहंकारावर झालेला वार परतवता येत नाही आणि पचवताही येत नाही!

त्या गरीब माणसाची मुलगी बंगलोरला नर्सिंगचे प्रशिक्षण घेत आहे. इतक्या दूर कशाला पाठविले? तर त्याचे उत्तर ''साहेब! तिथल्या प्रवेश परीक्षेत तिचा देशातून पहिला नंबर आला. ती नामांकित संस्था आहे. माझी मुलगी माझं नाव उंचावेल साहेब.'' मी गहिवरलोच. रेवनपल्लीहून एक मार्ग कमलापूरकडे जातो. तेथे वन विभागाचा हत्तींचा कॅम्प आहे. या कमलापूर पासूनच महाराष्ट्रात नक्षलवादाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

पुढे आलापल्लीच्या सिमेवरून भामरागडकडे जाणाऱ्या रस्त्याने वळलो. सुमारे २० कि. मी. अंतरावर वन विभागाचे 'ग्लोरी ऑफ आलापल्ली' हे राखीव वन आहे. त्यानंतर मात्र किर्रर जंगलाला सुरवात झाली. मोठमोठे वृक्ष आणि त्यांना वेढलेल्या लता वेलींनी नजीकचे दिसणे दुरापास्त झाले. झाडांच्या फांद्या अधूनमधून कारला घासू लागल्या. अशातच बांदीया नदी आडवी झाली. खळाळता प्रवाह, ढोली असणारे मोठे वृक्ष आणि लागलीच असणारे वळण यामुळे क्षणार्धात अदृश्य होणारी ही नदी गूढ वाटते. पुढे पेरिमिली गाव आणि पेरिमिली नदी येते. इथे सुद्धा निरव शांतता आणि गूढपणा जाणवतो. या नद्या ओलांडताना पिन ड्रॉप सन्नाटा कारण.... पेरिमिली दलम या नावाचा नक्षलवाद्यांचा मुख्य ठाणे असलेला हा भूभाग.

पुढे जंगल विरळ होते आणि दिसतो तो बाबा आमटेंचा लोकबिरादरी प्रकल्प. संध्याकाळची वेळ असल्याने या प्रकल्पातील अनेक कार्यकर्ते पांढरी आखूड पॅन्ट आणि सदरा घालून रस्त्याच्या कडेने फिरताना दिसले, त्याक्षणी सर्वच विकास आमटेच वाटले. पुढे ३ किलोमीटर अंतरावर पर्लकोटा नदी ओलांडली. नावाप्रमाणे मोत्यासारखे पाणी धारण करणारी ही नदी. पात्रातील खडकांवरून उड्या मारीत वेगाने वाहत होती. क्षणभर या दृश्याने मोहित झालोच. ही नदी ओलांडली की लागलीच भामरागड लागते. अंधार व्हायला सुरवात झाल्याने आम्ही तडक उंच टेकाडावरील विश्रामगृह गाठले. खेटूनच पामूल-गौतम नदी वाहती आहे. तिच्या प्रवाहाचा खळखळणारा नाद ऐकू येत होता. तेव्हा वाफाळलेल्या चहाचा आस्वाद व्हरांड्यातील आराम खुर्च्यांवर बसून त्या नादाचा आनंद घेतला. थोडावेळ बगीच्यात फिरून पाय मोकळे केले. खानसाम्याच्या सांगण्यानुसार जेवण लवकर आटोपून झोपी गेलो.... कारण 'ब्रह्ममुहूर्तावर आंघोळ आटोपून बाहेर पडलो तर ब्रह्मानंदी टाळी लागते आणि उद्याची पहाट वर्षातील सर्वोत्तम असू शकते' असे त्याचे म्हणणे होते''.

सांगायचे काय, तर पहाटे ३ वाजताच उठून आन्हीकं आटोपून आम्ही बाहेर आलो, तर काय नजारा! सगळीकडे धुकेच धुके. दाट एवढे की, दोन फुटावरील दिसणेही दुरापास्त झाले होते. त्यातच वऱ्हांड्यातील टिनांवरून पाण्याचे थेंब टपटप करीत जमिनीवर पडताना दिसत होते. थोडे ओणवे होऊन प्रकाशात लहान लहान तृणांकडे बघण्याचा प्रयत्न केला. पाने, फुले, फांद्या अण् ती बरड जमीनही ओलीचिंब होऊन वेगळाच गंध येत होता. संपूर्ण रात्र दवात भिजून रानभर पसरली होती आणि दवाचे अत्तर झालेले होते.

अशा मंत्रमुग्ध वातावरणाचा आस्वाद घेताना पहाट केव्हा झाली ते कळलेच नाही. अनेकविध रंगांच्या फुलपाखरांच्या पंखावरून झाडांच्या पानांना जोजवित ती आली. गुडूप परिसराला हळूहळू जाग आली होती. पक्ष्यांच्या किलबिलाटाने झाडांनाही जाग आली. तेव्हा कळले निसर्ग म्हणजे सौंदर्याचा, चैतन्याचा साक्षात्कार! त्या चैतन्याच्या दळवळणाऱ्या परिस्पर्शानं आम्ही आमचे अस्तित्व विसरलो आणि समाधिस्त होत द्वैत-अद्वैताच्या पलीकडे पोहोचलो. आमची तंद्री तुटली ती खानसाम्यानं आणलेल्या गरमागरम चहानं. तो हळूच पुटपुटला,'अंमळ बागेत फिरून घ्या आणि ताबडतोब पामूल-गौतम आणि इंद्रावतीचा संगम बघून घ्या. पुढे वळण घेऊन शाळेच्या

आयुष्यात बऱ्याच वेळा आपण ज्या गोष्टी लक्षात ठेवायच्या आहेत त्या विसरून जातो आणि ज्या गोष्टी विसरून जायच्या आहेत त्या लक्षात ठेवतो!

पाठीमागून डावीकडे वळा तुम्हाला त्रिवेणी संगम दिसेल. घाई करा साहेब,' त्याची विनंती हुकूम समजूनच बागेत फेरफटका मारला. खालची माती आणि हिरवळ केसरी-लाल झालेली दिसली. पाठीमागे उभ्या असलेल्या खानसाम्याने सांगितले ''साहेब! हे सर्व जंगली फुलांचे परागकण आहेत. आज धुक्याने ते वर न जाता खाली पडलेले आहेत'' कम्पाउंडच्या बाहेर पडताच पामूल-गौतम आणि इंद्रावतीचा मनोहारी संगम दिसतो. या दोन नद्यांमध्ये हिरवाकंच डोंगर आडवा येतो. त्यामुळे इंद्रावती फक्त या संगमानजीकच दिसते. हा संगम बघून उत्तराखंडातील रूद्रप्रयाग येथील मंदाकिनी आणि अलकनंदाच्या संगमाची आठवण झाली. त्या नद्यांसारख्याच ह्या नद्या सुद्धा अत्यंत प्रवाही आहेत. पुढे शाळेच्या बाजूने डावीकडे वळल्याबरोबर पर्लकोटा तिच्या सवंगड्यांना भेटण्यास उत्सुक दिसली. ही नदी मात्र खोडकर. तिचा प्रवाहसुद्धा तेवढाच जबरदस्त. या त्रिवेणी संगमाच्या भोवतालचा प्रदेश हिरव्यागार टेकड्यांनी युक्त आहे. सूर्योदय झालेला होताच तेवढ्यात बगळ्यांचा थवा हळूवारपणे पंख फैलावत पाण्याला समांतर उडत दक्षिणेच्या दिशेने लुप्त झाला.

अंमळ पुढे सरकलो. समोरच्या वृक्षाकडे बघितले, असं वाटलं, तो वाहत्या पाण्यात सावकाश पाय सोडून बसला आहे आणि तिच्या खळखळत्या लाटांकडे एकटक बघत आहे. मी सुद्धा तसाच प्रयत्न करून बघितला, पण जमले नाही.

जागा सोडाविशी वाटली नाही तरी पलीकडील बाबा आमटेंच्या 'लोकबिरादरी' प्रकल्पाला भेट देण्यासाठी काढता पाय घेत प्रकल्पापाशी पोहोचलो. गेटवर पासेस मिळवून आंत प्रवेश केला. इथे जागोजागी नेटकेपणा दिसून येतो. डॉ. विकास आमटेंना माडिया आदिवासियांची सेवा करण्याचे बाबा अमटेंनी सुचविले. ती आज्ञा समजून डॉ. विकास आमटेंनी जंगलात झोपड्या बांधून या कार्यात झोकून दिले. शून्यापासून सुरूवात झाल्यानंतर सध्या बारावीपर्यंत शाळा, राहण्यासाठी मुलामुलींची वेगवेगळी होस्टे्लस, कर्मचारी - शिक्षकांसाठी घरे, अद्ययावत काम्प्युटर व विज्ञान प्रयोगशाळा, खेळण्यासाठी प्रशस्त मैदान, जखमी व निराधार प्राण्यांची सुश्रुषा आणि त्यासाठी वेगळी सोय. इथे जवळपास १५०० लोकांचा राबता असून या सर्वांना लागणारे धान्य, भाज्या व इतर आवश्यक वस्तू इथल्या शेतातच पिकवण्यावर प्रकल्पाचा भर असतो. त्यासाठी सर्वांचीच निःस्वार्थ सेवा उपयोगात आणली जाते. ठिकठिकाणी सोलर आणि बायो एनर्जीचा उपयोग केल्याने पर्यावरण शुद्ध आहे.

विपरित परिस्थितीशी झुंज देत असणाऱ्या माडिया गोंड जमातीसाठी हा प्रकल्प म्हणजे स्वर्गच आहे. त्यामुळेच ते विकास आमटेंना देव मानतात.

मित्रहो, निसर्गरूपी देवाला समजण्यासाठी जीवनात एकदा तरी महाराष्ट्राच्या सुदूरपूर्वेला असलेल्या भामरागड आणि सिरोंच्या येथील त्रिवेणी संगमांना भेट द्या. तुम्ही नक्कीच आपले अस्तित्व विसरून जाल. तुम्हाला विश्वोत्पत्तीची रचना समजेल. तुम्हाला जाणवेल, फार वर्षापूर्वी आकाश होतं, जे सारखं रंग बदलत रहायचं/त्याच्याखाली ढग पळायचे/ मग गवत उगवलं आणि एका चिमणीच्या बोलण्याचा आवाज आला/ रात्री तारे प्रकटले आणि इतक्या जवळ आले की आम्ही त्यांना हात लावू शकू/ त्यावेळी झाडांना नांवे नव्हती आणि दगडसुद्धा नुकत्याच जन्मलेल्या मुलांसारखे झोपून असायचे...

शब्दांकन :
**दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी, उज्ज्वलनगर
वर्धारोड, नागपूर - ४४००२५
दूरध्वनी - ९७६६०२३४१५,९८३४६३६६५५

आयुष्यात कोणतीच गोष्ट कधीही कायमची नसते. एकतर तिचा काळ संपून जातो किंवा आपली वेळ संपून जाते!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांची सह्याद्री वाहिनीवर मुलाखत




कृषी सुधारणा विधेयक विरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर समाज माध्यमांमध्ये खूप मोठा गदारोळ सुरू आहे. समाज माध्यमांच्या या एकूण भूमिकेबद्दल चर्चा करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांना दिनांक ९ फेब्रुवारी २०२१ रोजी सह्याद्री वाहिनी दूरदर्शनने मुलाखतीसाठी बोलावलं होतं.

ही मुलाखत संध्याकाळी आठ वाजता डी डी सह्याद्री वाहिनीवर थेट प्रक्षेपित झाली.

### मराठी संशोधन संदर्भात अतिथी व्याख्यान

दिनांक ४ मार्च २०२१ रोजी मराठी संशोधन पत्रिकाचे संपादक डॉ. प्रदीप कर्णिक यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानावेळी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी महाविद्यालयात संशोधक आणि मराठी संशोधन पत्रिका यांच्यात सहकार्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रदीप कर्णिक यांनी मार्गदर्शनावेळी ग्रंथ समीक्षा, मुलाखती यांसारख्या संभाव्य संशोधन क्षेत्रांवर भाष्य केले, जे तरुण संशोधक पुढे घेऊन जाऊ शकतात. कार्यक्रमास प्रा. नारायण बारसे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रशांत धर्माधिकारी तर आभार प्रदर्शन डॉ. जयश्री सिंह यांनी मानले.

### आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त सत्कार समारंभ

महिला विकास कक्ष आणि बीएएमएमसी/एएमसीजे विभागाने संयुक्तपणे स्त्री पुरुष समानतेसाठी कार्यरत असलेल्या पुरुष उवाच्य समूहाचे संस्थापक आणि सदस्य मुकुंद किर्दत यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले. प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते श्री. किर्दत यांचा सत्कार करण्यात आला. नंतर विविध क्षेत्रातील महत्त्वाच्या व्यक्तीं सोबत पॅनल चर्चा घेण्यात आली. स्मिता नायर दिग्दर्शित कटवेची क्वीन या चित्रपटाचे प्रदर्शनही फिल्म सोसायटीने केले. कार्यक्रमात शिक्षक तसेच विद्यार्थी हे मोठ्या संख्येने सहभागी होते.

### स्कॉपस अनुक्रमिका जर्नल रिसर्च तर्फे अतिथी व्याख्यान

सोमवार दिनांक १५ मार्च २०२१ रोजी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली स्कॉपस जर्नलमध्ये आपला पेपर कसा प्रकाशित करावा या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर यांनी स्कॉपस अनुक्रमिका जर्नल बद्दल आपले मत व्यक्त केले. तसेच डॉ. स्मिता जपे यांनी संशोधन विषय निवडणे, संशोधनाचे प्रश्न कसे विकसित करावे, मुख्य म्हणजे आपले संशोधन कसे लिहावे व कसे आयोजित करावे यासारख्या

विषयांवर प्रकाश टाकला. व्याख्यानास ५५ शिक्षक आणि संशोधक अभ्यासक उपस्थित होते.

**फॉऊंडेशन कोर्स विभाग तर्फे कार्यशाळेचे आयोजन**

दिनांक १६ मार्च ते १९ मार्च २०२१ या कालावधीत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या सक्षम मार्गदर्शन व प्रेरणा अंतर्गत फाऊंडेशन कोर्स विभाग व विद्यार्थी मंच यांनी व्हर्च्युअल सॉफ्ट स्किल प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी श्री. अरविंद केळकर यांनी विद्यार्थ्यांना मुलाखत तंत्र, वेळ व्यवस्थापन, कार्यसंघ याबद्दल मोलाचे मार्गदर्शन केले. सर्व विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. तसेच कार्यशाळेत घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमात ऐकूण ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

**मूल्यवर्धित कोर्सेचे आयोजन**

दिनांक ९ मार्च २०२१ ते २० मार्च २०२१ या कालावधीत विद्या प्रसारक मंडळाचे के. जी. जोशी कॉलेज ऑफ आर्टस् आणि एन. जी. बेडेकर कॉलेज ऑफ कॉमर्स (स्वायत्त विभाग) यांनी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनानुसार क्रिएटिव्ह ऍण्ड कन्टेन्ट रायटिंग या मूल्यवर्धित कोर्सेचे आयोजन केले होते. ३० तासांच्या कालावधी असलेला हा कोर्स एकूण २८ विद्यार्थ्यांनी पूर्ण केला. उद्योग तसेच विविध शैक्षणिक संस्थानी या वेळी सत्रे दिली. विद्यार्थ्यांना प्रबुद्ध करणारे प्रख्यात वक्ते अधिवक्ते यांच्या सहकार्याबद्दल डॉ. संगीता मोहंती कोर्स समन्वय व उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.

**इंटर-कॉलेजिएट मनी सिम्फनी**

दिनांक २५ मार्च २०२१ रोजी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक मॅडम यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनानुसार, बँकिंग इन्शुरन्स विभाग आणि वित्तीय बाजारपेठाने इंटर-कॉलेजिएट सिम्फोसियम मनी सिम्फनीचा तिसरे सत्र यशस्वीरित्या पार पाडले. या वेळी रवींद्र पलांडे डीजीएम इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंड बीएसई लिमिटेड हे अध्यक्ष होते. विशाल गाडा सीएमओ आणि सह-संस्थापक आर्थिक नियोजन अकादमी देखील सामील झाले. पॅनेल चर्चे मध्ये सर्व सदस्य, महाविद्यालायचे माजी विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या वैचारिक ज्ञान आणि सादरीकरणाच्या कौशल्यावर आधारित तीन स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्यांची घोषणा ही उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी केली. कार्यक्रमाला १०३ विद्यार्थ्यांची नोंद झाली होती. डॉ. मृणमयी थत्ते यांनी अतिथी वक्त्यांचे आभार मानले.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे अठ्ठावीसावे पुष्प**

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे अठ्ठावीसावे पुष्प दिनांक ५ एप्रिल २०२१ रोजी ज्येष्ठ कवयित्री, लेखिका नीरजा यांनी 'आजची स्त्री किती आधुनिक?' या विषयावर ऑनलाईन स्वरूपात गुंफले.




डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची समृद्ध परंपरा आणि त्यातून होणारे विचारमंथन याचा विद्यार्थ्यांना व शिक्षकांना खूप लाभ होतो असे मत यावेळी

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केले.

'आधुनिक स्त्रीची नेमकी व्याख्या काय?', असे विचारत कवयित्री नीरजा यांनी आपल्या व्याख्यानास सुरुवात केली. ज्या स्त्रीने तिचं आत्मभान व सत्व जागृत केलं ती आधुनिक स्त्री. स्वयंपाक घराबाहेरील जगाबद्दलच्या जिच्या जाणिवा जागृत झाल्या व गरज असेल तेव्हा दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वतःसाठी स्वतःचे निर्णय घेणाऱ्या स्त्रीला आधुनिक म्हणता येईल. केवळ बाह्य बदल म्हणजे आधुनिकता नाही तर इथे वैचारिक आधुनिकता अधिक महत्त्वाची आहे, असे मत नीरजा यांनी मांडले.

जन्मतः स्त्री किंवा पुरुष हा भेद नसतो, पण समाज हे लैंगिक भान जागृत करतं आणि बाईला बाईपण सुपूर्द केलं जातं. स्त्रीकडे आजही वस्तू म्हणून पाहिलं जातं, तिच्या चारित्र्याचा संबंध मूल्ये, नीतिमत्ता, वैचारिक प्रामाणिकता याच्याशी न जोडता केवळ तिच्या शरीराशी जोडला जातो. आजच्या जाहिरात आणि मालिका यामध्येही याच प्रकारची पुरुषसत्तेचा प्रभाव असणारी स्त्री दिसते. बाईला जसं बाईपणाच्या चौकटीतून बाहेर काढण्याची गरज आहे तसेच पुरुषालाही त्याच्या मर्दपणाच्या चौकटीतून बाहेर काढणे गरजेचे आहे. वैचारिक पातळीवर आधुनिक होणाऱ्या स्त्री-समाजात, विचारांनी प्रगल्भ असणारे पुरुष तयार करण्याची गरज कवयित्री नीरजा यांनी व्यक्त केली.

संस्कृती प्रवाही असते, तिच्यातल्या जुन्या उत्तम गोष्टी उचलून नवीन विचारांच्या सोबत संस्कृती स्वीकारायला हवी. आंधळेपणाने रूढी आणि चालीरीती यांना स्वीकारू नये. स्त्री आणि पुरुषांनी जात, धर्म, पंथ, बाह्यसौंदर्य या पलीकडे जात एकमेकांच्या आनंदासाठी व एकमेकांच्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी जगायला हवं. सत्त्वाची जाणीव, निर्णयक्षमता, वैचारिक आधुनिकता स्त्री मध्ये असायला हवी तर तरलता व सामंजस्य हे गुण पुरुषात असायला हवेत, असे स्पष्ट व्यक्तव्य नीरजा यांनी आपल्या व्याख्यानात केले. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीची सोबती होत सर्व स्त्रियांनी वैचारिक आधुनिकतेकडे वाटचाल करायला हवी असे म्हणत नीरजा यांनी त्यांच्या सावित्री या कवितेतील काही ओळी सादर करून व्याख्यानाचा शेवट केला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोतरे झाली. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या, उपप्राचार्य, सर्व प्राध्यापक झूम अँपद्वारे सहभागी झाले होते. सर्व विद्यार्थी व इतर श्रोतावर्ग फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून जोडले गेले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका डॉ. भावना देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन उप-प्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी केले. तांत्रिक बाजू प्रा. प्राची नितनवरे यांनी सांभाळली. व्याख्यानाची सांगता पसायदानाने झाली.

**टू डेज वन नाईट या बेल्जियन चित्रपटाचे ऑनलाईन प्रदर्शन**

दिनांक शनिवार, १० एप्रिल रोजी सकाळी ११.१५ रोजी विद्या प्रसारक मंडळाचे जोशी-बेडेकर कॉलेज फिल्म सोसायटी ने टू डेज वन नाईट (२०१४) या बेल्जियन चित्रपटाचे ऑनलाईन प्रदर्शन आयोजित केले होते. हा चित्रपट सँड्रा नावाच्या एका युवतीची गोष्ट आहे, हिला तिच्या सोबत असलेल्या कामगारांना तिच्या बाजूने मत मांडायला फक्त शनिवार, रविवार असतो. कामगार बोनससाठी नकार देतील आणि तिची नोकरी तिला मिळेल अशी चित्रपटाची थोडक्यात कथा आहे. २०१४ च्या सिडनी फिल्म फेस्टिव्हलमध्ये या चित्रपटाने सिडनी फिल्म पुरस्कार जिंकला. ८७ व्या अकादमी पुरस्कारांमध्ये बेल्जियमच्या सर्वोत्कृष्ट परदेशी

भाषेच्या चित्रपटाच्या अकादमी पुरस्कारासाठी सादर झालेल्या चित्रपटासाठी या चित्रपटाची निवड झाली होती.

चित्रपटाचा कथाभाग खालील प्रमाणे -

बेल्जियम मधल्या एका शहरात सॅन्ड्रा १८ कामगार असलेल्या एका छोट्याशा कंपनीत काम करत आहे. ती गेले काही दिवस डिप्रेशनमुळे कामावर नसते. मधल्या काळात मालकाच्या लक्षात आले आहे की, ती नसली तरी इतर कामगारांकडून थोडे जास्त काम करून घेतले तर काम होऊ शकते. तिची गरज नाही. पण तिला सरळ नाही तरी कसे म्हणणार? मग मालक एक शक्कल लढवतो. तो कामगारांना सांगतो की सॅन्ड्रा ला परत कामावर घेतले नाही तर तो कामगारांना बोनस देऊ शकेल आणि तिला कामावर ठेवले तर बोनस मिळणार नाही. कामगारांनी निर्णय घ्यावा. परस्पर निर्णय होईल. शुक्रवारी कामगारांचा बोनसच्या बाजूने निर्णय होतो. पण सॅन्ड्रा पुनर मतदान घ्यायला लावते. आता सोमवारी पुन्हा मतदान होणार असते. त्या अगोदर तिला सतरा कामगारांना भेटून तिच्या बाजूने किमान दहा मते मिळवायची असतात. ती एकेका सहकार्याला भेटत जाते आणि आपल्याला घडते बेल्जियम मधील छोट्या उद्योगांमधील कामगारांच्या जीवन संघर्षाचे दर्शन. त्यात काळे-गोरे स्त्री-पुरुष सर्व जण आहेत. त्यांची व्यवधाने आहेत. सॅन्ड्रा बद्दल सहानुभूती आहे आणि बोनसचेही आकर्षण आहे. या सर्वांतून वाट काढताना तिला तिचा नवरा व मुलांचीही साथ आहे.

चित्रपटाचे संयोजन जोशी-बेडेकर कॉलेजचे फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले.

**बी. कॉम विभाग तर्फे मूल्यवर्धित कोर्सेचे आयोजन**

बी. कॉम (लेखा व वित्त) विभागाने भारतीय लेखा असोसिएशन ठाणे शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयकरांची ई फाइलिंग (आयटीआर आणि टीडीएस) वर मूल्यवर्धित कोर्स हा ३० तासांच्या कालावधीत एकूण १५ दिवस घेण्यात आलेला कोर्स होता. कोर्स हा यूजी आणि पीजी विद्यार्थ्यांसाठी वेलीडिक्टरी फंक्शन गूगल मीट कम्युनिकेशन इंटरफेसद्वारे आयोजित करण्यात आला. मुख्य वक्ता सीए मनीष गाडिया (अध्यक्ष डब्ल्यूआयआरसी आयसीएआय) यांनी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीए अर्पित काबरा (सेक्रेटरी डब्ल्यूआयआरसी आयसीएआय) यांच्या अपस्किलिंग अँड अपस्केलिंग अंडरग्रेज्युएट एम्प्लॉयबिलिटी विषयावर भाषण करणारे लेखा क्षेत्रातील करिअर संधी विषयी भाषण केले. उपप्राचार्य प्रा. डॉ. महेश पाटील यांनी कार्यक्रमास मार्गदर्शन केले, इतर प्रतिष्ठित प्राध्यापकांसह समन्वयकांच्या उपस्थितीने हा कार्यक्रम संपन्न झाला. उद्योग व शैक्षणिक क्षेत्रातील सर्व नामांकित संसाधन व्यक्ती, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्या प्रियंवदा टोकेकर, सुभाष शिंदे, ग्रंथपाल- नारायण बारसे, संपूर्ण विभाग सदस्य व विद्यार्थी यांच्या उपस्थित ह्या कोर्सची सांगता झाली.

**स्टुडंट्स फोरम अंतर्गत : प्रभावी वाचनाच्या सवयींवर एक सत्र**

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक स्टुडंट्स फोरमच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली सामाजिक उद्योजक अमृत देशमुख यांचे प्रभावी वाचनाच्या सवयींवर एक सत्र आयोजित केले गेले होते. टेड टॉक स्पीकर आणि बुकलेट अँप संस्थापक, श्री. देशमुख यांनी सर्वसाधारण वाचनाच्या सवयींबद्दलच्या मिथकांना वाचा फोडली आणि विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लावून काळाचा प्रभावी उपयोग करण्याचे आवाहन केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे तर डॉ. प्रज्ञा राजेबहादूर यांनी फोरमच्यावतीने राबविलेल्या उपक्रमांचा आढावा घेऊन सुरवात केली.

मूर्ख माणसे आपापसात संभाषण करू लागली की, शहाण्या माणसाने मौन धारण करणे योग्य.

**विक्री व विपणन विभाग आयोजित एक अतिथी व्याख्यान**

बी.व्ही.ओ.सी.आय.एन.च्या विक्री व विपणन विभागाने दिनांक १० एप्रिल २०२१ रोजी प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली 'ओरल हायजीन मॅनेजमेंट' या विषयावर अतिथी व्याख्यान आयोजित केले होते. पीजीसीआय, बीडीएस, प्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. अमित मोटवानी यांनी या विषयावर प्रामुख्याने दंत समस्यांवरील कारणे, परिणाम आणि त्यावर उपाय यावर लक्ष केंद्रित केले होते. सहाय्यक प्रोफेसर रोमा बी यांनी अतिथींचा परिचय तसेच डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांनी या कार्यक्रमाचा उद्देश सांगितला. व्याख्यानमालेचे अध्यक्ष म्हणून उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, शिक्षक व विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते. विक्री आणि विपणन विभागाने हा कार्यक्रम आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांचे आभार व्यक्त केले.

**फोंडेशन कोर्स विभाग (एसवाय) तर्फे अतिथी व्याख्यानाचे आयोजन**

फोंडेशन कोर्स विभाग (एसवाय) ने प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या प्रेरणेने रविवार, दिनांक ११ एप्रिल २०२१ रोजी स्पर्धात्मक परीक्षा विषयावरील अतिथी व्याख्यानाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. स्वप्निल पाटील, उपविभागीय दंडाधिकारी, पानिपत, हरियाणा. उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, प्रा. सुभाष शिंदे यांच्यासह शिक्षकवर्ग तसेच सुमारे २३० विद्यार्थी उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करताना दृढनिश्चय, शिस्त व समर्पण तसेच संयम व सातत्य यांचे महत्त्व पटवून दिले. स्पर्धात्मक परीक्षांच्या जगातील अनेक अनन्य उदाहरणे व आव्हानेही त्यांनी सहभागींना दिली. या जागृती कार्यक्रमास सर्व सहकार्य व प्रोत्साहन दिल्याबद्दल फाउंडेशन कोर्स विभागाने प्राचार्य डॉ. सुचित्रा नाईक यांचे आभार व्यक्त केले.

मुंबई विद्यापीठाच्या ५३ व्या महोत्सवाचे आयोजन विद्यापीठातर्फे आभासी पद्धतीने करण्यात आले होते. महाविद्यालयाने सलग आठव्या वर्षी देखील विभागीय स्तरावरील चषक राखण्यात यश मिळवले.

विविध स्पर्धांमधील निकाल खालीलप्रमाणे –

**Zonal Round Results**

1. Indian Classical Vocal
2nd Prize Student : Prajakta Shendre

2. Indian Light Vocal
2nd Prize Student : Suraj Soman

3. On the Spot Painting
1st Prize Student: Snigdha Shetkar

4. Poster Making
3rd Prize Student : Dhanashri Bhoir

5. Cartooning
3rd Prize Student: Snigdha Shetkar

6. Elocution
1st Prize Student: Gargi Goregaonkar

7. Story Telling
1st Prize Student : Fariyal Sayyed

8. Mono Acting
1st Prize Student : Yuvraj Tamhankar

9. Mimicry
1st Prize Student : Yuvraj Tamhankar

10. Western Vocal
No Prize Student : Trunika Gamre


**Results for Final Round :**

1. Elocution
2nd Prize Student : Miss. Gargi Goregaonkar

2. Mono Acting and Mimicry
Consolation prize Student : Yuvraj Tamhankar

यावर्षी सिद्धी शिंदे व युवराज मानकर यांनी विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून जबाबदारी सांभाळली व मुग्धा बापट यांनी समन्वयक म्हणून काम केले.

**विद्यार्थ्यांनी संपादित केलेल्या 'ऋत' या वर्तमानपत्राचे उद्घाटन**



विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी- बेडेकर महाविद्यालयात जनसंज्ञापन व पत्रकारिता विभागा तर्फे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'ऋत' या वार्षिक वृत्तपत्र अंकाच्या अकराव्या आवृत्तीचे प्रकाशन दिनांक २१ एप्रिल २०२१ रोजी आभासी माध्यमाने संपन्न झाले.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सीएनबीसी आवाजचे व्यवस्थापकीय संचालक शैलेंद्र भटनागर उपस्थित होते. महाविद्यालयातर्फे प्रकाशित झालेला हा ११वा अंक असून यावर्षी फिनिक्स या मध्यवर्ती संकल्पनेवर आधारित सोळा पानांचा यात समावेश करण्यात आला आहे. यातील १२ पाने इंग्रजी व चार पाने मराठी हिंदी व संस्कृत या भाषांमधील बातम्या व लेखांना वाहून घेतलेली आहे.

नवीन शैक्षणिक धोरण, कोविड योद्ध्यांच्या मुलाखती, वातावरणीय बदल तसेच शैक्षणिक उपक्रमांबद्दल वृत्त व लेख यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

या उद्घाटन कार्यक्रम प्रसंगी बोलताना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या की, पत्रकारितेत श्रेयस आणि प्रेयस या दोन गोष्टींवर भर देऊन समाजासाठी नेमके श्रेयस्कर काय आहे हे पत्रकारांनी लिहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी केलेल्या या उपक्रमाचे त्यांनी यावेळी कौतुक केले.

सी एन बी सी आवाज या वृत्तवाहिनीचे व्यवस्थापकीय संचालक शैलेंद्र भटनागर यांनी पत्रकारितेची सद्यकालीन परिस्थिती यावर आपले मत मांडले. भारतीय बाजारामध्ये पुढच्या काही वर्षात नवीन संधी येणार असून आर्थिक साक्षरता वाढवण्याची नितांत गरज आहे असे ते म्हणाले. मागच्या वर्षभरात कोविडमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत पत्रकारितेत नवनवे बदल होत असून येणाऱ्या बदलांना आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांनी तयार असले पाहिजे असेही ते म्हणाले. विद्यार्थीदशेपासूनच भांडवली बाजार, शेअर मार्केट, म्युच्युअल फंड इत्यादी आर्थिक विषयांबद्दल देखील विद्यार्थ्यांनी सजग राहिले पाहिजे व भारताच्या ऊर्जस्वल यशामध्ये सहभागी झाले पाहिजे असे ते म्हणाले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल नारायण बारसे, सर्व विभाग प्रमुख व समन्वयक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या भाषणानंतर प्रश्न उत्तरांचा रंजक कार्यक्रम रंगला. या वर्तमानपत्राच्या संपादनात डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी इंग्रजी विभाग तसेच डॉ. विमुक्ता राजे व प्रा. मानसी जंगम यांनी मराठी विभागास मार्गदर्शन केले. जनसंज्ञापन विभागाचे समन्वयक डॉ. महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अभिनय तालखेडकर, अमित गायकवाड, गार्गी गोरेगावकर, हर्षाली मोहीले व फरियल सय्यद यांनी विद्यार्थी संपादक म्हणून काम पाहिले.

---

या विश्वाविषयक सर्वात अनाकलनीय गोष्ट ही आहे की, हे विश्व काही प्रमाणात का होईना पण आकलनीय आहे.

अभिनय तालखेडकर याने सूत्रसंचालन तर उमेश महाले यांनी आभार प्रदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी पत्रकारितेतील नवे आयाम समजून घेण्यासाठी मागच्या दहा वर्षांपासून अविरत सुरू असलेल्या या उपक्रमाचे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी अभिनंदन केले आहे.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे विविध कार्यक्रम संपन्न झाले.**

शहीद दिनाचे महत्त्व पटवून देण्याकरता २३ मार्च २०२१ रोजी ऑनलाइन प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यामध्ये ९८ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महिला सबलीकरण या विषयावर २६ मार्च २०२१ रोजी वेबिनार संपन्न झाले. यावेळी सौ. सुचेता आचार्य उद्योजिका यांनी आपल्या यशस्वी उद्योजिका पर्यंतचा प्रवास उलगडला. नेतृत्व, बाजार भाव, नफा, तोटा, विजय, पराजय याबद्दल त्यांना आलेले अनुभव त्यांनी मांडले. या कार्यक्रमाला ९२ विद्यार्थी उपस्थित होते.

दिनांक २ एप्रिल २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या ४१ सदस्यानी योगा दिवस साजरा केला. सकाळी ८:०० ते सायंकाळी ५:०० या कालावधीत विद्यार्थ्यांनी त्यांच्या घरी योगासनांचे विविध प्रकारांचे प्रात्यक्षिक केले.

**बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले.**

१) मुबसेरा इकबाल शेख या सूक्ष्मजीवशास्त्राच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने एस.आय.ई.एस. या संस्थेमार्फत आयोजित 'Bainy Quiz' या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

२) झुबिया अली कादर खान या सूक्ष्मजीवशास्त्राच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने एस.आय.डब्लु.एस. या संस्थेमार्फत मार्फत आयोजित वर्ड सर्च (Word Search) या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक व बायो पोर्टर या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

३) शांभवी मुकुंद जोशी या सूक्ष्मजीवशास्त्राच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने विविध स्पर्धामध्ये घवघवीत यश संपादन केले.

अ) बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Debate आणि Elocution या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक पटकावला.

ब) बेडेकर महाविद्यालयातर्फे आयोजित क्विझ (Quiz) या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक, लेटर रायटिंग (Letter Writing) या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक, Debate स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक पटकावला.

४) अनुश्री अनिल केणी या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित 'PPT Presentation' या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

५) खेयाती शैलेश गुप्ता या जैवतंत्रज्ञान पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित 'Singing Competition' या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

६) वेदांग किशोर सुवर्णा या जैवतंत्रज्ञान पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्याने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित 'Photography Competition' या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

७) आदित्य भूपेश कुमार यादव या जैवतंत्रज्ञान दुसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्याने बा.ना. बांदोडकर विज्ञान

महाविद्यालयातर्फे आयोजित Sketching Competition या स्पर्धेमध्ये चौथा क्रमांक पटकावला.

८) संजिदा राबिला इस्लाम या जैवतंत्रज्ञान पहिल्या वर्षाच्या विद्यार्थिनीने गुरू नानक कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Poster Making Competition या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

९) स्वप्ना प्रवीण देऊपुरकर या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Debate Competition या स्पर्धेमध्ये पहिला क्रमांक पटकावला.

१०) प्राची प्रवीण डुंबरे या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने Indian Institutes of Technology Bombay या संस्थेमार्फत आयोजित GATE BT या स्पर्धेमध्ये AIR 60 क्रमांक पटकावला.

११) प्राची प्रवीण डुंबरे या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने IISC Banglore या संस्थेमार्फत आयोजित IIT JAM या स्पर्धेमध्ये AIR 456 क्रमांक पटकावला.

१२) स्वप्ना प्रवीण देऊपुरकर या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने IISC Banglore या संस्थेमार्फत आयोजित IIT JAM या स्पर्धेमध्ये AIR 819 क्रमांक पटकावला.

१३) गायत्री नरेश वारेकर या सूक्ष्मजीवशास्त्रच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Calligraphy या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

१४) मानसी सुभाष साळुंखे या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Essay Writing या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

१५) मानसी सुभाष साळुंखे या जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Rangoli Competition या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

१६) गार्गी सुशील गुप्ते जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Dance Competition या स्पर्धेमध्ये Consolation क्रमांक पटकावला.

१७) प्रेरणा सुरेश वेद्रे जैवतंत्रज्ञान तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Sketching Competition या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

१८) अश्विनी नंदकिशोर साळुंखे या सूक्ष्मजीवशास्त्राच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Poem Recitation या स्पर्धेमध्ये दुसरा क्रमांक पटकावला.

१९) साक्षी सूर्यकांत शिंदे या सूक्ष्मजीवशास्त्राच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थिनीने बा.ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातर्फे आयोजित Dance Competition या स्पर्धेमध्ये तिसरा क्रमांक पटकावला.

**Curiosity Club तर्फे मुव्ही स्क्रीनिंग कार्यक्रम**

वनस्पतिशास्त्र विभागाच्या Curiosity Club तर्फे २४ मार्च २०२१ रोजी मुव्ही स्क्रीनिंग कार्यक्रम संपन्न झाला. The Green Vaccine ही डॉक्युमेंटरी यावेळी दाखविण्यात आली. यावेळी ३५ विद्यार्थ्यांने आपला सहभाग नोंदवला. तसेच यानंतर विद्यार्थी व शिक्षक यांनी या डॉक्युमेंटरीवर आधारित विषयावर चर्चा केली.

**जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे Statement of Purpose या विषयावर वेबिनार**

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभागातर्फे विविध

स्पर्धा परीक्षांची तयारी करण्याकरता विद्यार्थ्यांना आवश्यक Statement of Purpose (SOP) या विषयावर २२ मार्च २०२१ रोजी ऑनलाइन वेबिनार संपन्न झाले. बांदोडकर महाविद्यालयाच्या याच विभागाचा माजी विद्यार्थी श्री. आदित्य छत्रे, पी. एच. डी. स्कॉलर, मॅक्स प्लॅन्क इन्स्टिट्यूट ऑफ मॉलिक्युलर सेल बायोलॉजी, जर्मनी याने यावेळी मार्गदर्शन केले. अगदी प्रवेश प्रक्रिया अर्ज कसा भरावा, SOP बाबत कोणत्या अडचणी येऊ शकतात हे विविध उदाहरणासहित सर्वांना समजावून सांगितले. ५२ विद्यार्थी या वेबिनारला उपस्थित होते.

**Stat-o-Sphere Fest**

संख्याशास्त्र विभागाच्या Stat-o-Sphere हा Fest संख्या क्लब तर्फे १५ व १६ मार्च २०२१ रोजी संपन्न झाला. लॉकडाऊन परिस्थितीमुळे Google Meet च्या माध्यमातून विविध कार्यक्रम आयोजित केले. ज्यामध्ये Hit the Point (Power Point Presentation), Meme - Nawazi (Meme Making Competition), Stat Wars (Quiz Competition) , Luck Apna Apna (Housie), The Art Station (Sketching, Zentangle Art and Poster Making Competition) , Jung - E - Shatranj (Chess Competition) and Woh Din Bhi Kya Din The (Reel Making Challenge on theme College Memories) यांचा समावेश होता.




**संख्याशास्त्र विभागातर्फे Basics of R software या विषयावर ८ मार्च ते २० मार्च २०२१ या कालावधीत ४५ तासांचा ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रम संपन्न झाला.**

तृतीय वर्ष संख्याशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाईन अभ्यास सहल International Institute for Population Science, Govandi येथे १० फेब्रुवारी २०२१ रोजी संपन्न झाली. लॉकडाउनच्या कालावधीत प्रत्यक्ष जाणे शक्य नसल्यामुळे वेबेक्स या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. कैलाशचंद्र दास, प्रोफेसर यांनी त्यांच्या व्याख्यानाच्या माध्यमातून International Institute for Population Science संस्थेबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांनी देखील त्याच्या शंकांचे निरसन केले. ५० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपला सहभाग नोंदवला.

**डॉ. मोजेस कोलेट आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित**

विद्या प्रसारक मंडळाचे बा. ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय, ठाणेचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांना वर्ल्ड एज्युकेशन असोसिएशन व रॉयल्टी ऑफ कुवेत यांच्यातर्फे देण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. डॉ. कोलेट यांनी सामाजिक बांधिलकी जपत महाविद्यालयातील महिलांच्या विकासासाठी, शैक्षणिक प्रगतीसाठी अतिशय महत्त्वपूर्ण कार्य बजावले आणि त्याकरताच त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे. एन.सी.सी. ऑफिसर या नात्याने कामात शिस्त पण त्याचबरोबर समजुतदार स्वभाव या त्यांच्या गुणाने अनेक गरजू विद्यार्थ्यांना त्यांनी नेहमीच सहकार्य केले आहे.

**National Conference on Advances in Chemical Sciences sustainable development**

विद्या प्रसारक मंडळाचे बा.ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय, ठाणे व इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, डॉक्टर होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने "Advances in Chemical Sciences sustainable development" या विषयावर ९ – १०

एप्रिल २०२१ रोजी ऑनलाइन पद्धतीने राष्ट्रीय परिषद संपन्न झाली.

डॉ. डी. आर. अंबावडेकर, रसायनशास्त्र विभाग प्रमुख व उपप्राचार्य बा.ना. बांदोडकर विज्ञान स्वायत्त महाविद्यालय यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे यांनी इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स संस्थेबद्दल माहिती उलगडली. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. मोजेस कोलेट यांनी आभासी पद्धतीने डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व उपस्थित सर्वांचे स्वागत केले. या प्रसंगी डॉ. अनिता गोस्वामी गिरी, सहयोगी प्राध्यापक यांनी परिषदेच्या आयोजनामागची भूमिका मांडली.

आभासी पद्धतीने या परिषदेचे उद्घाटन प्रमुख अतिथी डॉ. अँथनी क्रस्टो, प्रमुख वैज्ञानिक, ग्लेनमार्क फार्मास्युटिकल यांच्या हस्ते झाले. या परिषदेमध्ये सादर केलेले पेपर्स ISBN क्रमांक असलेल्या प्रोसिडिंगस मध्ये छापून येतात. या प्रोसिडिंगचे उद्घाटन डॉ. अँथनी क्रस्तो प्रमुख वैज्ञानिक, ग्लेनमार्क फार्मास्युटिकल यांच्या हस्ते झाले.

या परिषदेच्या बीजभाषण प्रा. संजीव झाडे, प्राध्यापक. IISER, कोलकत्ता यांनी थिओफिन व त्यांच्या निर्मितीबद्दल आपले विचार मांडले. प्रा. विवेक पोलशेट्टीवर, सहयोगी प्राध्यापक, TIFR यांनी नॅनोटेक्नॉलॉजी क्षेत्रात रसायनशास्त्राची भूमिका याबद्दल मार्गदर्शन केले. डॉ. अमित झोडगे, संशोधन विभाग, मॅनेजर, स्पाइस किंग हॉलांड, नेदरलँड यांनी कार्बन डाय ऑक्साइडचा वापर बायोएक्सट्रॅक्शन सुपर क्रिटिकल फ्लुईड यामध्ये कशाप्रकारे करता येईल याबाबत चर्चा केली. परिषदेच्या पहिल्या दिवशी ११ संशोधकांनी आपले संशोधन पेपर सादर केले.

परिषदेच्या दुसऱ्या दिवशी डॉ. मुरलीधर इंगळे, संचालक, रेयनिश फार्माकेम, वडोदरा यांनी केमिकल इंडस्ट्रीच्या वाढीकरिता विविध प्रक्रियांचा वापर कशा पद्धतीने करता येईल याबद्दल मार्गदर्शन केले. प्रा. राजेंद्र शिरसाट, प्राध्यापक, गोवा विद्यापीठ यांनी Topography of Molecular Electrostatic potential या विषयावर आपले विचार मांडले. या परिषदेच्या समारोपप्रसंगी राजस्थान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. ए. डी. सावंत उपस्थित होते.




या परिषदेची सांगता राष्ट्रगीताने झाली. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होण्याच्या दृष्टीने विद्या प्रसारक मंडळाच्या बा.ना. बांदोडकर स्वायत्त महाविद्यालयातर्फे २००२ पासून दर वर्षी एका राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी करोनाच्या महामारीमुळे ही परिषद ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरित्या संपन्न झाली.

या परिषदेच्या माध्यमातून इंडस्ट्री क्षेत्रातील व संशोधन क्षेत्रातील संशोधक यांचे विचार शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांना ऐकायला मिळाले. ग्रीन केमिस्ट्री मध्ये होत असलेल्या विविध संशोधनाबाबत या परिषदेच्या माध्यमातून नवीन प्रवाह समोर आले.

## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### हिवाळी परीक्षा २०२० चा अहवाल

मार्च २०२१ मध्ये महाराष्ट्र स्टेट बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशनची हिवाळी परीक्षा २०२० घेण्यात आली. त्यामध्ये विभागानुसार उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण खालील प्रमाणे आहे.

| विभाग / सत्र | उत्तीर्ण विद्यार्थी % | टॉपरची नावे | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) प्रथम वर्ष (Computer, I Scheme) | १०० | १) सोनावणे तनय तुषार | ९८.१४ |
| | | २) बोरकर वैष्णवी शिरीष | ९८.१४ |
| | | ३) मुस्ताबसिर हबिल भगत | ९७.५७ |
| २) द्वितीय वर्ष (Computer, I Scheme) | १०० | १) राजे आर्यन गिरीश | ९९.८७ |
| | | २) राजे आर्या गिरीश | ९९.४७ |
| ३) तृतीय वर्ष (Computer, I Scheme) | १०० | १) शिंदे तेजश्री सतीश | ९९.७८ |
| | | २) करांडे आदर्श अरुण | ९९.५६ |
| ४) प्रथम वर्ष (EPS, I Scheme) | १०० | १) सुर्वे सामर्थ्य विलास | ९१.२९ |
| | | २) खोडे गौरी संतोष | ९०.५७ |
| ५) द्वितीय वर्ष (EPS, I Scheme) | १०० | १) कद्री ताबिन तरेक् | ९६.७५ |
| | | २) शेख अस्लम् अहमद हुसेन | ९५.१३ |
| ६) तृतीय वर्ष (EPS, I Scheme) | ९८.७५ | १) बारगोडे अथर्व संतोष | ९५.८० |
| | | २) पिसे माधुरी शिवाजी | ९३.८० |
| ७) प्रथम वर्ष (IE, I Scheme) | ९६.५५ | १) शेलार ज्ञानेश्वर दत्तात्रय | ९१.८६ |
| | | २) चौधरी चेतन मनिष | ९०.७१ |
| ८) द्वितीय वर्ष (IE, I Scheme) | १०० | १) दामोदर साई राजेश | ९५.०० |
| | | २) सोनावणे अभिषेक प्रकाश | ९१.८८ |
| ९) तृतीय वर्ष (IF, I Scheme) | ९७.७८ | १) शेलार साक्षी दत्तात्रय | ९७.२२ |
| | | २) केरकर प्रणीत विनय | ९६.७८ |

ज्यादिवशी आपली थोडीही प्रगती झाली नाही तो दिवस फुकट गेला असं समजा.

| | | | |
|---|---|---|---|
| १०) प्रथम वर्ष (IF, I Scheme) | १०० | १) जिन्दानी नायब असिफ<br>२) गांधी आर्या | ९८.७१<br>९७.७१ |
| ११) द्वितीय वर्ष (IF, I Scheme) | १०० | १) नारकर अदिती विलास<br>२) एपनपल्ली कीर्ती श्रीनिवास | १००.००<br>१००.०० |
| १२) तृतीय वर्ष (IF, I Scheme) | १०० | १) देशपांडे संपदा संजय<br>२) देवरे इशिका संजय | १००.००<br>९९.२९ |
| १३) प्रथम वर्ष (IS, I Scheme) | १०० | १) डिसोझा जुड सिमॉन<br>२) तेजल राजेन्द्र जेजुरकर | ९०.१४<br>८६.४३ |
| १४) द्वितीय वर्ष (IS, I Scheme) | ९८.११ | १) आव्हाड श्रीयश वसंत<br>२) दुबे सौरभ प्रवीण | ९५.५३<br>९३.१८ |
| १५) तृतीय वर्ष (IS, I Scheme) | ९४.५५ | १) जैन सम्यक चंद्रशेखर<br>२) लाड रितीक निलेश | ९६.९५<br>९३.५२ |
| १६) ॲडव्हान्स डिप्लोमा इन एनर्जी मॅनेजमेंट ॲन्ड ऑडिट | १०० | १) सोज वॉल्टर मेनवेल<br>२) शिंदे गणपत बारकू | ८९.४१<br>८८.८९ |

**'Technological Innovations at Work place Safety' - या दिवशी ची २६ वी ऑनलाईन राष्ट्रीय परिषद संपन्न**

ऑथोगिड ठिकाणी असुरक्षित वातावरण नेहमीच पाहायला मिळते. म्हणून सुरक्षितेसंबंधी अनेक विक्रम नियम अस्तित्वात आहेत. त्यामध्ये सुधारणाही होत आहेत. परंतु औद्योगिक ठिकाणी अवजड मशिनरी आणि साहित्याद्वारे कामगारांना काम करावे लागते. शिवाय कारखान्यांतून रासायनिक वायूची निर्मिती होत असते. अशा कामांच्या ठिकाणी कामगारांना फार सतर्क राहून काम करावे लागते. कामाच्या ठिकाणी तांत्रिकदृष्टीने सुरक्षिततेसंबंधी नवनवीन उपाय योजनेच्या संदर्भात विचार-विमर्ष करण्यासंबंधी विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनातर्फे 'Technological Innovations at Work place Safety' या विषयीची ऑनलाईन राष्ट्रीय परिषद दि. २३ ते २४ एप्रिल २०२१ रोजी पार पडली.

दि. २३ एप्रिल २०२१ रोजी कार्यक्रम सचिव सौ. व्ही. ए. जोशी (विभाग प्रमुख इन्स्ट्रुमेंटेशन) यांच्या स्वागतपर भाषणांनी कार्यपरिषदेची सुरुवात झाली. त्यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे आणि उपस्थितांचे स्वागत केले.



परिषदेत विविध संख्येतील विद्यार्थी उपस्थित होते. परिषदेचे प्रमुख आयोजक डॉ. डी. के. नायक यांनी परिषद आयोजनामागचा उद्देश स्पष्ट करून सद्यस्थितीत सुरक्षितेसंबंधीचे महत्त्व स्पष्ट केले. दरम्यान ऑनलाईनच्या माध्यमातून शोधनिबंधाचे प्रकाशन करण्यात आले.



सदर परिषदेला प्रमुख वक्ते म्हणून चंद्रशेखर लिमये (संचालक सुपरटेक इन्स्ट्रुमेंटेशन सर्व्हिसेस (इं) प्रा. लि.) लाभले होते. प्रसंगी त्यांनी उपस्थितांशी संवाद साधताना म्हटले की, तीन तांत्रिक नवनवीन गोष्टी कामाच्या ठिकाणी सुरक्षितेसंबंधी आत्मसात करायला पाहिजेत. उदा. संदेशवहन पद्धतीत सतत सुधारणा करावी. कामगारांसाठी आरोग्य आणि सुरभेच्या संबंधी IOT चा वापर आणि सुरक्षा साधनांचा वापर अशा या महत्त्वपूर्ण गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे असे म्हटले.





ऋषीकेश अहिरराव (डेप्युटी जनरल मॅनेजर, EMS: TD सिमेटेशन इंडिया लि.) यांनी कन्स्ट्रशन साईट मध्ये तांत्रिक बाबी मोबाईल ॲपद्वारे कशाप्रकारे विकसित कराव्यात या संदर्भात विवेचन केले. कोणत्याही उद्योगाची सुरुवात करताना नेहमी तो उद्योग सुरू करण्यातही त्यातील आव्हानात्मक बाबीचा विचार करावा असे त्यांनी सुचित केले.

पारस कोबळे (प्रमुख सेफ्टी तज्ज्ञ MMRCL) यांनी कायदेशीर बाबी संदर्भात आपले विचार मांडले. विविध औद्योगिक कारखान्यांतील दंड आणि शिक्षे संदर्भात उपस्थितांना माहिती दिली आणि त्यांनी सद्यस्थितीतील वस्तुस्थितीची अनेक उदाहरणे ऐकविली.

ओंकार गोखले (सिनियर इंजिनिअर I & C Worley इंजिनियरिंग, सिंगापूर) यांनी विविध प्रोसेस इंडस्ट्रिज मधील सुरक्षेसंबधीतील नवनीत माहिती दिली आणि अशा विविध इंडस्ट्रिजमध्ये तंत्रज्ञानाचा परिणाम मोठ्या प्रमाणात दिसून येत असल्याचे म्हटले आहे.



डॉ. रिना वालेच्छा (occupational therapise and senior Ergonomist, Godrej interio) यांनी सद्यस्थितीत घरातून काम (Work From Home) करण्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण माहिती दिली. घरातून काम करीत असताना आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



दि. २४ एप्रिल २०२१ ला परिषदेच्या दुसऱ्या सत्राची सुरुवात मंदार फडके (CEO अभिसम सॉफ्टवेयर प्रा. लि.) यांच्या भाषणाने झाली. त्यांनी माहिती तंत्रज्ञानाचा परिणामकारक वापर सुरक्षेसंबंधीच्या ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी होऊ शकतो असे सांगितले व संबंधीत संस्थेतील प्रोसेस इंडस्ट्रिजमधील किंमतीत बचतसुद्धा होईल.




डॉ. रश्मी चौधरी (असोसिएट प्रोफेसर, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्य, भोपाळ) यांनी बायोसेफ्टी पद्धत आणि प्रयोगशाळेचे प्रमुख कार्य या संबंधीचे विचार मांडले.




राजेंद्र लोखंडे (सिफ्ट इनचार्ज, डिझास्टर मॅनेजमेन्ट विभाग MCGM) यांनी डिझास्टर मॅनेजमेंटमधील धोक्यासंबंधीची माहिती दिली. समीर पेंडसे (एरिया मॅनेजर अॅण्ड की अकाउंन्ट मॅनेजर, Bureau Veritas India Pvt. Ltd.) यांनी तंत्रज्ञान आणि पद्धती या संबंधी विचार व्यक्त केले. तंत्रज्ञानाचा सुरक्षेसंबंधी वापर चांगला होत असल्याचे दिसून येते.




सागर जोरापूर (Asst. Manager, Wireless Sales and Marketing, Emersen Automation Solutions, India) यांनी सुरक्षेसंबंधी डिजिटला वापर या विषयीची विचार मांडले.




सदर परिषदेला जवळ-जवळ २५० जणांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. शिवाय यू-ट्युबच्या माध्यमातून अनेकांनी लाईव्ह हजेरी लावली होती. अनेकांनी परिषदेसंबंधीचे आपले अभिप्राय नोंदविले. आणि श्रोत्यांच्या शंकाना तज्ज्ञांनी समाधानकारक उत्तरे दिली.

शेवटी परिषदेच्या कार्यक्रम सचिव सौ. व्ही. ए. जोशी यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

सदर परिषद ही माहितीयुक्त ज्ञानसंपन्न आणि मनोरंजकपणे पार पडली. खरोखरच सुरक्षेसंबधीच्या तांत्रिक नवनवीन बाबी संदर्भात आपल्या कार्यस्थळी उपयोजन करण्यासंदर्भात तज्ज्ञाकडून अशी अमूल्य माहिती उपस्थितांना प्राप्त झाली.

●●●

खूप माणसांची स्वप्ने या एका विचारामुळे अपूर्ण राहतात. तो म्हणजे 'लोक काय म्हणतील?'

(पृष्ठ क्र.२ वरून - **संपादकीय)**

दोघेही रायचौधरी यांच्या संशोधनाने प्रभावित झाले होते. दोघांनाही एकेआर यांना प्रत्यक्ष भेटण्याची तीव्र इच्छा होती. १९६३ साली अमेरिकेच्या टेक्सास शहरात भौतिकशास्त्राची जी आंतरराष्ट्रीय परिषद भरली तेथे त्यांची प्रत्यक्ष भेट झाली. अतिशय साधा आणि सरळ माणूस अशी त्यांची प्रतिमा होती. धोती आणि कुर्ता असा त्यांचा गणवेश असायचा. विदेशात गेले तरच ते पॅन्ट शर्ट घालायचे. या निमित्ताने या महान शास्त्रज्ञाला मी अभिवादन करू इच्छितो.

**संदर्भ:**


१. संजीव धुरंधर यांचा करंट सायन्स (Current Science, Volume120, No. 6), २५ मार्च २०२१ च्या अंकातील Hidden Treasures of the Past हा लेख.

२. टाईम्स ऑफ इंडिया (Times of India), ८ ऑक्टोबर २०२० च्या अंकातील लेख (https://timesofindia.indiatimes. com/ city/ kolkata/bong-connection-how-raychaudhuri-eqiation-took-penrose-to-physics-nobel.)

३. यू ट्यूब वरील फिल्म (https://www. youtube.com/watch?v=osWlbg VlrPU.)


**- डॉ. सुधाकर आगरकर**

•••

## चिंतन

संस्था ही कोणतीही असो,
सरकारी, सहकारी,
खाजगी वा धर्मार्थ,
संस्थेत ठरावीक काम करणे,
हा झाला कायदा.
पण कामात स्वत:ला झोकून देणे,
ही झाली नैतिकता.
'मी पगार घेतो म्हणून काम करतो',
हा झाला व्यवहार.
संस्थेच्या अस्तित्वाची,
सुरक्षिततेची, प्रतिष्ठेची
योग्य काळजी घेण्याचे कार्य
मला पार पाडावयाचे आहे,
ही झाली आपुलकी.
संस्थेची प्रगती आहे तोवर माझे
अस्तित्व कायम आहे.
माझी प्रतिष्ठा आहे म्हणून संस्थेला
हानिकारक ठरेल, अशी कृती
मी कधीही करणार नाही.
पण सामाजिक ऋण
फेडण्याच्या भावनेने,
स्वत:ला कामात वाहून घेईन
ही प्रत्येकाची भावना असली पाहिजे,
यातच देशाचा विकास व
स्वत:चा उद्धार आहे.

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

### ❉ संपर्क ❉

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.